दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१९५ | बुधवार दि.१२ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

**संपादकीय**

### बॉम्बस्फोटाची छाया : नागरिकांचे भय आणि लोकशाहीची खरी परीक्षा

सामान्य नागरिक वेठीस, राजकीय आदब; तपासात पारदर्शकतेचा अभाव, आणि सुरक्षिततेसाठी लोकशाहीच्या मूल्यांचा संतुलन गमावणे या सर्व गोष्टी समाजाचा विश्वास हळहळीत टाकत आहेत.

## थोडक्यात...

### पाकिस्तानात बॉम्ब स्फोट ११ ठार, २५ जखमी

कराची : भारताची राजधानी दिल्ली सोमवहारी झालेल्या नंतर आता पाकिस्तनामध्ये दुपारच्या सुमारास इस्लामाबाद उच्च न्यायालयाबाहेर मोठा स्फोट झाला असल्याची माहिती समोर येत आहे. या हल्ल्यामध्ये ११ जण ठार झाले असून २० ते २५ जण गंभीर जखमी झाले आहेत. न्यायालय संकुलाच्या पार्किंग क्षेत्रात उभ्या असलेल्या कारमध्ये सिलेंडरचा स्फोट झाल्यामुळे हा स्फोट झाला. स्फोटाचा आवाज दूरवर ऐकू आला आणि आजूबाजूचा परिसर गोंधळला. स्थानिक पोलिसांच्या मते, न्यायालय परिसरात प्रचंड वाहतूक आणि गर्दी असताना हा स्फोट झाला. या स्फोटात अनेक वकील आणि नागरिक जखमी झाले आहेत.

### अन्यायाविरुद्ध आवाज उठवणार–रुपाली ठोंबरें

राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांना प्रवक्ते पदावरून काढल्यानंतर ठोंबरे यांनी एक फेसबुक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी थेट पक्षातील व्यवस्थेवर टीका केली आहे. शेतकरी कन्या डॉ. संपदा मुंडे यांना न्याय न देता, त्यांच्या चारित्र्यावर आघात करण्यात आला. या अन्यायाविरुद्ध आपण आवाज उठवणार. माझा आवाज दाबला जाईल. प्रस्थापित व्यवस्थेच्या छाताडावर पाय रोवून मी इथपर्यंत पोहोचले आहे. आपला इतिहास हा अन्याय सहन करणाऱ्यांचा नाही; गरज पडली तर 'ख्वाडा' करणाऱ्यांचा आहे, असा इशारा रुपाली पाटील ठोंबरे यांनी दिला आहे.

### राज्यात आता कारमध्ये सर्वांना सीटबेल्ट बंधनकारक

मुंबई : राज्यातील दुचाकी आणि चारचाकी वाहनांचे अपघात आणि त्यामध्ये होणाऱ्या मृत्यूंची गंभीर दखल सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या रस्ता सुरक्षा समितीने घेतली आहे. रस्ते अपघातांची संख्या कमी करण्यासाठी चारचाकी वाहनांमध्ये चालकाप्रमाणे आता सर्व प्रवाशांनाही सीटबेल्ट लावणे बंधनकारक करण्यात येणार आहे. त्याचबरोबर दुचाकी चालक आणि त्यामागील सहप्रवाशालाही हेल्मेट घालणे अनिवार्य करण्यात येणार असून, याची येत्या सहा महिन्यांत कडक अंमलबजावणी करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाचे रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष अभय सप्रे (सेवानिवृत्त न्यायाधीश) यांनी राज्य सरकारला दिले आहेत.

### निठारी हत्याकांडातील क्रुरकर्माची निर्दोष मुक्तता

नवी दिल्ली : नोएडाच्या निठारी गावात व्यापारी मोनिंदर सिंग पंढेर यांच्या घरामागील नाल्यात आठ मुलांचे सांगाडे सापडल्यानंतर २९ डिसेंबर २००६ रोजी निठारी हत्याकांड उघडकीस आले. १५ वर्षांच्या मुलीवर बलात्कार आणि हत्येप्रकरणी कोळीला दोषी ठरवण्यात आले होते आणि फेब्रुवारी २०११ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने त्याची शिक्षा कायम ठेवली होती. २०१४ मध्ये त्याची पुनर्विचार याचिका फेटाळण्यात आली होती. ऑक्टोबर २०२३ मध्ये न्यायालयाने कोळी आणि पंढेर दोघांनाही निठारीच्या अनेक प्रकरणांमध्ये निर्दोष मुक्त केले. २०१७ मध्ये ट्रायल कोर्टाने दिलेली मृत्युदंडाची शिक्षा रद्द केली होती.

# सोयाबीन हमीभाव खरेदी रखडली

## शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या नोंदणीत विलंब

पुणे । प्रतिनिधी

**शेतकरी उत्पादक कंपन्यांना अद्यापही शासनाकडून नोंदणीची परवानगी मिळालेली नाही. त्यामुळे सोयाबीनच्या हमीभाव खरेदी प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांना हमीभावाचा लाभ मिळण्यात विलंब होत असून, अनुभवी कंपन्यांना काही ठिकाणी नोंदणी न मिळाल्याने नाराजी वाढली आहे.**



अनेक शेतकरी उत्पादक कंपन्यांना अद्यापही शासकीय स्तरावरून नोंदणीची परवानगी व विशेष नोंदणी क्रमांक मिळालेला नाही. त्यामुळे राज्यात सुरू होणाऱ्या सोयाबीनच्या हमीभाव खरेदी प्रक्रियेत या कंपन्यांचा सहभाग अडथळ्यात आला आहे. परिणामी, शेतकऱ्यांना हमीभावाचा लाभ मिळण्यात विलंब होत असून, त्यांच्यात नाराजीचा सूर आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या म्हणण्यानुसार, शासनाने घालून दिलेली वार्षिक एक कोटी रुपयांची उलाढाल ही अट अव्यवहार्य आहे. अनेक कंपन्या शेतीसंबंधित अवजारे बँक, कृषी सेवा केंद्र किंवा बी–बियाणे विक्रीचे काम करतात. अशा परिस्थितीत इतकी मोठी उलाढाल करणे शक्य नसल्याचे त्या कंपन्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे त्यांनी मागणी केली आहे की, एक कोटी रुपयांच्या उलाढालीची अट रद्द करावी, जेणेकरून सर्व पात्र कंपन्यांना लवकर नोंदणी मिळू शकेल. शेतकरी उत्पादक कंपन्या या शेती विकासासाठी एकत्र आलेल्या संघटना आहेत. त्यामध्ये शेतकऱ्यांनीच गुंतवणूक केली आहे. कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली साठवणूक, प्रक्रिया आणि खरेदीसाठी पायाभूत सुविधा उभारल्या आहेत. ▶▶ पान २ वर

### नोंदणीबाबत तात्काळ निर्णय घ्या

नोंदणी प्रक्रिया पूर्ण न झाल्याने शेतकरी सध्या संभ्रमात आहेत. खरेदी केंद्रे उघडण्यात विलंब झाल्यास त्यांना बाजारातील कमी दरावरच विक्री करावी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी राज्य शासनाकडे तातडीने नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून हमीभाव खरेदीची सुरुवात लवकरात लवकर करावी, अशी मागणी केली आहे.

# राजधानीतील स्फोटानंतर महाराष्ट्रात अलर्ट जारी

## मुख्यमंत्री फडणवीसांच्या सुरक्षा यंत्रणांना महत्त्वाच्या सूचना

मुंबई । प्रतिनिधी

**दिल्ली बॉम्बस्फोटानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन राज्यातील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला आहे. तसेच मुंबईसह महाराष्ट्रात सतर्कतेचा इशारा जारी करण्यात आला आहे.**



दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ सोमवारी (१० नोव्हेंबर) संध्याकाळी एका कारमध्ये बॉम्बस्फोट झाला. मेट्रो स्टेशनच्या गेट नं. १ जवळ कारमध्ये हा स्फोट झाला. हा स्फोट इतका भीषण होता की त्यामुळे आजूबाजूच्या ८ ते १० गाड्यांनाही आग लागली. तसेच या स्फोटात ११ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी आहेत. या स्फोटानंतर देशातील प्रमुख शहरांत हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन राज्यातील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला आहे. तसेच मुंबईसह महाराष्ट्रात सतर्कतेचा इशारा जारी करण्यात आला आहे. केंद्रीय गुप्तचर यंत्रणांकडून अलर्ट जारी केला असून, राज्यातील महत्त्वाच्या शहरांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. मुंबईतील प्रमुख ठिकाणांची म्हणजेच सीएसएमटी, दादर, चर्चगेट यासारख्या गर्दीच्या रेल्वे स्थानकांवर आणि इतर सार्वजनिक ठिकाणी सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. मुंबईतील ▶▶ पान २ वर



### महाराष्ट्रात तीन दिवसापासून गारठा वाढला

मुंबई । प्रतिनिधी

उत्तरेकडील थंड वारे राज्याच्या दिशेने वाहू लागल्याने गारठा वाढला आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी किमान तापमान १० अंशाच्या खाली घसरल्याने थंडीची लाट आली आहे. राज्यात मुख्यत: कोरड्या हवामानासह गारठा कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. मुंबईसह पुणे, विदर्भ, मराठवाडा गारठल्याचे पाहायला मिळत आहे.

बंगालच्या उपसागरात समुद्रापासून ३.१ किलोमीटर उंचीवर ▶▶ पान २ वर

# दिल्ली कार स्फोट प्रकरणाचा तपास एनआयएकडे

नवी दिल्ली । वृत्तसंस्था


**केंद्रीय गृह मंत्रालयाने मंगळवारी (दि. ११) दिल्ली कार स्फोट प्रकरण राष्ट्रीय तपास संस्थेकडे (एनआयए) सोपवले. सोमवारी संध्याकाळी मध्य दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ हुंडई आय २० कारमध्ये स्फोट झाला होता.**



दिल्ली स्फोटातील मृतांची संख्या १२ वर पोहोचली आहे. यामध्ये दोन महिलांचा समावेश आहे. वीस जखमींवर उपचार सुरू आहेत. दोन मृतदेहांची ओळख पटली आहे. उर्वरितांची ओळख डीएनए चाचणीद्वारे पटवली जाईल. सोमवारी संध्याकाळी ६:५२ वाजता लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळ चालत्या कारमध्ये एक शक्तिशाली स्फोट झाला होता. या सगळ्याच्या मागे नेमकं कोण आहे हे शोधून काढणार आणि त्यांना धडा शिकवणार, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले आहे. आता मराठी अधिकारी अर्थात एनआयएचे प्रमुख सदानंद दाते यांच्या ▶▶ पान २ वर


# आगामी निवडणुकीत भाजपाला सर्वांत मोठा पक्ष बनवा–मुख्यमंत्री

मुंबई । प्रतिनिधी



महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजल्यानंतर सगळ्याच राजकीय पक्षांनी अलर्ट मोडवर कामाला सुरुवात केली आहे. भाजपानेही आपली पक्ष यंत्रणा ॲक्टिव्ह केली असून, मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हानिहाय परिस्थितीचा आढावा घेतला. मिनी विधानसभेत (स्थानिक स्वराज्य संस्था) भाजपाला सर्वांत मोठा पक्ष बनवण्यासाठी प्रयत्न करा. महायुती जिंकली पाहिजे, असे उद्दिष्ट ठेवून काम करा, अशा सूचना त्यांनी भाजपा नेत्यांना केल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली 'वर्षा' निवासस्थानी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हा प्रभारींची बैठक संपन्न झाली. यावेळी भाजपाचे राष्ट्रीय सह संघटन महामंत्री शिवप्रकाश, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह वरिष्ठ नेते उपस्थित होते. मोजके दिवस हातात असल्याने जिल्हा प्रभारी आणि स्थानिक ▶▶ पान २ वर




# धोंडे, खांडे,क्षीरसागर पक्षांच्या आश्रयाला

बीड । प्रतिनिधी





पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे शिवसेनेचे तत्कालीन जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांना पक्षाकडून काढण्यात आले होते. त्यासोबत विधानसभा निवडणुकीत बंडखोरी केल्याने माजी आमदार भीमराव धोंडे यांनाही पक्षाने बाजूला केले होते आणि कुठेच नसलेले राजकीय पार्श्वभूमी असलेले हेमंत क्षीरसागर यांनी देखील आता मोठ्या राजकीय पक्षाचा आश्रय घेतला आहे. ऐन निवडणुकीमध्ये घेतलेल्या निर्णयामुळे यांच्या ताकतीचा पक्षाला किती फायदा होतो हे पाहणे गरजेचे आहे.

आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील माजी आमदार भीमराव धोंडे हे भाजपाचे मोठे लीडर आहेत. याशिवाय मतदार संघात शिक्षण महर्षी म्हणून त्यांची ओळख आहे. मागील विधानसभा निवडणुकीत त्यांनी बंडखोरी करत निवडणूक लढवली. त्यानंतर पक्षाने त्यांना थोडेसे बाजूला केल्यानंतर आता त्यांनी भाजप सोडून महायुतीचाच घटक पक्ष ▶▶ पान २ वर

### मनसेसोबतच्या युतीसंदर्भात अद्याप कोणतीही चर्चा नाही–सपकाळ

मुंबई । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेबरोबर युती वा आघाडीसंदर्भात अद्याप कोणतीही चर्चा झालेली नाही. नाशिकमध्ये झालेल्या आजच्या बैठकीत काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून जे लोक गेले होते, त्यांना पक्षाने पाठवले नव्हते, त्यांच्या उपस्थितीशी पक्षाचा काहीही संबंध नाही, त्या लोकांना कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात आली आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.

बुलढाणा येथे प्रसार माध्यमांशी ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.११ नोव्हेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३२.५० क्विंटल | २,३५१ | ३,००० | २,७१२ |
| ज्वारी/हायब्रिड : ७०.०० क्विंटल | १,९०१ | ३,५९६ | २,७७४ |
| मका/लोकल: ५०.०० क्विंटल | १,९५० | १,९५० | १,९५० |
| तूर : ४.०० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| उडीद : १४.०० क्विंटल | ३,९०० | ५,०७० | ४,६५७ |
| बाजरी: ४१.५० क्विंटल | २,६०० | २,८६१ | २,७५९ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,२०० | ६,२०० | ६,२०० |
| सोयाबीन:२९७.५० क्विंटल | ४,२५० | ४,७०० | ४,५५२ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,२५१ | ५,६०० | ५,४२५ |

# स्टॅम्प ड्युटी सवलतींची आता दर महिन्याला तपासणी

## पार्थ पवार प्रकरणानंतर सरकार ॲक्शन मोडवर

पुणे । प्रतिनिधी

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्याशी निगडीत जमीन व्यवहार प्रकरणातील अनियमिततेनंतर राज्याच्या नोंदणी आणि मुद्रांक विभागाने आता कडक पाउल उचलली आहेत. विभागाने आता राज्यभरातील सर्व ५१९ उपनोंदणी कार्यालयांसाठी स्टॅम्प ड्युटी सवलत किंवा सूट मिळालेल्या कागदपत्रांची तपासणी दरमहा ५ तारखेपर्यंत पूर्ण करणे अनिवार्य केले आहे.**




पार्थ पवारांच्या प्रकरणात स्टॅम्प ड्युटी नुकसान आणि इतर चुका समोर आल्या होत्या. विभागाने काढलेल्या परिपत्रकात १० तारखेपर्यंत तपासणी पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपाययोजनेचा उद्देश महसूल गळती थांबवणे आणि नोंदणी प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आहे. हा आदेश नोंदणी आणि मुद्रांक अधीक्षक राजेंद्र मुथे यांनी एका परिपत्रकाद्वारे जारी केला. या परिपत्रकात उपनोंदणी महानिरीक्षकांना अशा कागदपत्रांची वेळेवर तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हा निर्णय घेण्यामागे पुण्यातील हवेलीतील संयुक्त उपनोंदणी कार्यालयात घडलेल्या एका ▶▶ पान २ वर

## अग्रलेख

# बॉम्बस्फोटाची छाया: नागरिकांचे भय आणि लोकशाहीची खरी परीक्षा

सामान्य नागरिक वेठीस, राजकीय आदब; तपासात पारदर्शकतेचा अभाव, आणि सुरक्षिततेसाठी लोकशाहीच्या मूल्यांचा संतुलन गमावणे या सर्व गोष्टी समाजाचा विश्वास हळहळीत टाकत आहेत.

मुंबईतील भयानक बॉम्बस्फोटानंतर संपूर्ण देश थरारला होता. दिल्लीतील अलीकडील बॉम्बस्फोटामुळे पुन्हा एकदा नागरिकांच्या मनाला धक्का बसला आहे. या घटनांनी स्पष्ट दाखवले आहे की, भले आपण तंत्रज्ञानाने सज्ञ झालो आहोत, भले शहरांची रचना आधुनिक झाली आहे, तरीही आपली सुरक्षा व्यवस्था आणि सार्वजनिक शांती अजूनही असुरक्षित आहे. बॉम्बस्फोट म्हणजे फक्त ध्वनी, धूर किंवा अविश्वसनीय दहशत नाही; ती लोकांच्या मनातील भय, असुरक्षितता आणि प्रश्नांची श्रेणी निर्माण करते. निष्पाप नागरिक या भयानक घटनेत मृत्यूमुखी जातात, काही जखमी होतात, तर अनेकांची मानसिकता आयुष्यभरासाठी बदलते. यामागील कारणे नेहमीच अस्पष्ट राहतात. ''कोण जबाबदार आहे?'', ''सर्वसामान्यांना का वेठीस धरले जाते?'' अशा प्रश्नांची गर्दी नागरिकांच्या मनात असते. पोलीस यंत्रणा त्वरित कामाला लागते, तपास सुरू करतात, प्रशासन सक्रिय होते, आणि सुरक्षा दल तैनात केले जाते, हे कौतुकास्पद आहे. परंतु या प्रक्रियेत अनेकदा सामान्य नागरिकांचे हक्क आणि स्वातंत्र्य दुर्लक्षित केले जाते. काहीवेळा सामान्य नागरिकांना वेठीस घालणे, चौकशी करताना त्रास देणे, त्यांच्या घरांमध्ये किंवा कामाच्या ठिकाणी अचानक छापा मारणे ही कृती घडते. त्याच वेळी, शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांबाबत आदबाचे नियम काटेकोर पाळले जातात. ही परिस्थिती नागरिकांच्या मनात प्रश्न निर्माण करते.

''लोकशाहीमध्ये सर्व नागरिकांसोबत समान न्याय होत नाही का?'' लोकशाहीची खरी परीक्षा हीच परिस्थिती आहे. नागरिकांचे हक्क, सुरक्षितता आणि सरकारी जबाबदारी यामध्ये संतुलन राखणे ही शासनाची खरी जबाबदारी आहे. जेव्हा सामान्य लोकांना वेठीस धरले जाते, चौकशी करताना त्रास दिला जातो, आणि सत्ता किंवा प्रभाव असलेल्या व्यक्तींना सौजन्याने वागवले जाते, तेव्हा लोकशाहीची नैतिकता धोक्यात येते. नागरिकांमध्ये सरकारविरोधी भावना निर्माण होतात, विश्वास कमी होतो आणि भयाचे वातावरण वाढते. बॉम्बस्फोटानंतर माहितीचा अभाव ही आणखी एक मोठी समस्या आहे. तपास सुरू असतो, पुरावे गोळा होत असतात, हे समजणे आवश्यक आहे, परंतु सामान्य नागरिकांपर्यंत स्पष्टीकरण का पोहोचत नाही? अफवा पसरतात, सोशल मीडिया तटस्थ माहितीपेक्षा चुकीची माहिती अधिक वेगाने पसरवते, आणि नागरिक भयग्रस्त होतात. पारदर्शकतेचा अभाव लोकशाहीच्या तत्त्वांना धोकादायक ठरतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या घटनांनी सामाजिक एकात्मतेवरही परिणाम होतो. काहीवेळा तपास प्रक्रियेत विशिष्ट समाजकेंद्रित किंवा राजकीय लक्ष केंद्रित केले जाते. त्यामुळे समाजात भेदभावाची भावना निर्माण होते. हे आणखी एक प्रश्न निर्माण करते: ''सर्व नागरिकांवर समान न्याय का होत नाही?'' कायदा सर्वांसाठी समान असावा, हे लोकशाहीचे मूलभूत तत्त्व आहे, परंतु प्रत्यक्षात ते नेहमी दिसत नाही. अशा परिस्थितीत भय, असंतोष आणि संशय वाढतो, ज्यामुळे समाजात अनावश्यक ताण निर्माण होतो. असे वातावरण निर्माण झाल्यास नागरिकांमध्ये भय, असंतोष आणि संशय वाढतो. सुरक्षा व्यवस्था जबाबदार आहे हे मान्य आहे, परंतु सुरक्षा आणि लोकशाहीच्या मूल्यांचा त्याग केल्यास समाजव्यवस्था दीर्घकाळ टिकू शकत नाही. नागरिकांचा विश्वास टिकवणे हे तितकेच महत्त्वाचे आहे जितके आरोपींचा शोध घेणे. संपूर्ण तपास त्वरित पार पडणे शक्य नाही, अनेक गुंतागुंतीच्या बाबी आहेत, पुरावे, आरोपी शोध, सुरक्षा धोरणे यांचा विचार करावा लागतो. परंतु या प्रक्रियेत नागरिकांचे हक्क, पारदर्शकता आणि न्यायप्रियता सर्वोच्च असली पाहिजे. प्रशासनाने हे जाणून घेणे आवश्यक आहे की, भय आणि संशय निर्माण होणाऱ्या परिस्थितीत नागरिकांचा विश्वास टिकवणे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. जितके आरोपींचा शोध घेणे. तपास प्रक्रियेत पारदर्शकता वाढवणे, नागरिकांशी संवाद साधणे, वेठीस घेण्याच्या निर्णयात न्याय सुनिश्चित करणे आणि सामान्य नागरिकांवर अन्यायकारक दबाव टाळणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. हे केल्यास नागरिकांचा विश्वास वाढेल, भय कमी होईल, आणि लोकशाहीची खरी ताकद दिसून येईल.

बॉम्बस्फोटांमुळे आलेल्या धक्क्यानंतरही आपल्याला लोकशाहीच्या मूल्यांवर ठाम राहणे आवश्यक आहे. सुरक्षा व्यवस्था सक्षम ठेवणे महत्त्वाचे आहे, पण मानवाधिकार, पारदर्शकता आणि न्यायसंगत प्रक्रिया यांचा समतोल राखणे हाच खरा ध्यास आहे. सुरक्षितता आणि लोकशाहीचे मूलभूत तत्त्व एकत्र टिकवणे हेच या काळातील सर्वात मोठे आव्हान आहे. नागरिक म्हणून आपल्याला जागरूक राहणे आवश्यक आहे. प्रशासकीय प्रक्रिया, सुरक्षा उपाय, आणि सरकारी निर्णय याबाबत प्रश्न विचारणे आवश्यक आहे. प्रशासनाला नागरिकांचा विश्वास जिंकण्यासाठी पारदर्शक, न्यायसंगत आणि जबाबदार धोरणे राबवावी लागतील. सुरक्षितता आणि लोकशाही यांचे संतुलन साधणे हेच या काळातले सर्वात मोठे आव्हान आहे आणि त्यावर ठाम राहणे हेच आपल्या समाजाच्या भविष्याचे खरे रक्षण आहे.

# जनतेच्या विकासासाठी राबवली जाणारी प्रत्येक योजना जनतेपर्यंत नेणार-उदयसिंह बोराडे

## सिमेंट रस्त्याच्या कामामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण



**मंठा । प्रतिनिधी**

**शहरातील वार्ड क्रमांक १५ येथे आज शिवसेना तालुकाप्रमुख तथा नगरसेवक उदयसिंह (उदय दादा) बोराडे यांच्या हस्ते सिमेंट कॉंक्रीट रस्त्याच्या कामाचे भव्य उदघाटन करण्यात आले. अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या या रस्त्याच्या कामामुळे परिसरातील नागरिकांमध्ये मोठा उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

या प्रसंगी वार्डातील मान्यवर, शिवसेना पदाधिकारी, स्थानिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनावेळी उपस्थित प्रमुख मान्यवरांमध्ये रामभाऊ काका बोराडे, संजय काळे, केशव बोराडे, शिवसेना महिला आघाडीच्या उपजिल्हा प्रमुख कासाबाई शिरगुळे, पिराजी पवळे, विलास बनसोडे, कृष्णा बोराडे, तरवटे मामा, गुत्तेदार नितीन सोळंके, पवार मामा, शेंडगे मामा, अमोल कांबळे, सरपंच राजेश काकडे, गोपीनाथ ढेंगळे, पप्पू बोराडे, देशमाने तसेच वार्डातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनानंतर बोलताना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे म्हणाले,की ''मंठा शहरातील प्रत्येक नागरिकाला उत्तम सुविधा मिळाल्या पाहिजेत हे आमचे प्राधान्य आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, प्रकाशयोजना, आणि नागरिकांसाठी आवश्यक असणारी प्रत्येक सुविधा देण्यासाठी आम्ही झटत आहोत. वार्ड क्रमांक १५ मधील सिमेंट कॉंक्रीट रोड हे त्या ध्येयाकडे वाटचाल करणारे एक महत्वाचे पाऊल आहे. शिवसेनेच्या बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारसरणीतून प्रेरणा घेत आम्ही गावोगाव विकासाच्या योजना राबवत आहोत. जनतेच्या विश्वासावर आम्ही कायम खरे उतरू आणि प्रत्येक कामात पारदर्शकता ठेवू. जनतेचा विकास, ही आमची बांधिलकी आहे आणि ती पूर्ण करण्यासाठी आम्ही नेहमी सज्ज आहोत.'' उदय दादांच्या या शब्दांनी उपस्थित नागरिकांकडून जोरदार टाळ्यांचा कडकडाट झाला. वार्ड क्रमांक १५ मध्ये मागील अनेक वर्षांपासून रस्त्यांची अत्यंत बिकट अवस्था होती. पावसाळ्यात चिखल, खड्डे, तसेच पाण्याचा साठा यामुळे नागरिक त्रस्त होते. स्थानिक रहिवाशांनी वारंवार मागणी करूनही हे काम रखडलेले होते. अखेर नगरसेवक उदय दादा बोराडे यांच्या पुढाकाराने हे काम मंजूर झाले. सिमेंट कॉंक्रीट रोड पूर्ण झाल्यानंतर परिसरातील वाहतूक सुलभ होईल, तसेच रहिवाशांना पावसाळ्यातील त्रासातून मोठा दिलासा मिळणार आहे. स्थानिक नागरिक रामभाऊ बोराडे, यांनी सांगितले की, ''उदय दादा बोराडे यांनी आमच्या वार्डात विकासाची नवी दिशा दाखवली आहे. अनेक वर्षांचा प्रश्न सुटला आहे.'' तर संजय काळे म्हणाले, ''दादांच्या नेतृत्वाखाली मंठा शहरातील अनेक विकासकामे सुरू असून, नागरिकांचा विश्वास कायम टिकून आहे.'' या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय काळे यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. आभार प्रदर्शन केशव बोराडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी अथक प्रयत्न केले.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित नागरिकांनी तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पान ६ वरून...

### धारुर नगर परिषदेमध्ये

घेतली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे नितीन भाई शिनगारे, बालाजी जाधव व डॉ. मयूर सावंत हे नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक लढण्यास इच्छुक आहेत. मात्र प्रकाश दादा कोणाची निवड करतात हे आगामी काळात लवकरच ठरेल. उमेदवार चांगला आला तर राष्ट्रवादी कॉंग्रेसला यश मिळेल अशी शक्यता सध्या तरी दिसत आहे.

---------

### कुंडलिक खांडेंचा पुन्हा शिवसेनेत

पक्ष प्रवेशामुळे बीड विधानसभा मतदारसंघ तसेच बीड जिल्ह्यातील राजकारण चांगलेच बदलणार आहे. पक्षप्रवेशावेळी उध्दव ठाकरे म्हणाले, आपण गोपीनाथ मुंडे यांच्यावरील प्रेमापोटी आतापर्यंत बीड जिल्ह्यात भाजपला झुकते माप दिले. पण आता बीड जिल्ह्याची पूर्णत: विल्हेवाट लागली आहे. तिकडे कुणीच कुणाचे नाही. अशावेळी सर्वसामान्य जनतेच्या पाठिशी उभे राहणे हे आपले कर्तव्य आहे. जनतेकडूनही आपल्याला मोठी अपेक्षा आहे. शिवसेना मला पूर्वीपेक्षा जास्त वैभवशाली पाहिजेच. याचा अर्थ जनता आपल्यासोबत आली पाहिजे. त्यासाठी आपण मेहनत घेतली पाहिजे, असेही ते म्हणाले. यावेळी कुंडलिक खांडे यांनी आपण राजकारणाची सुरूवातच शिवसेनेतून केलेली असून आता आयुष्यभर शिवसैनिक म्हणून काम करू, जिल्ह्यात शिवसेना वाढवून दाखवू, असा शब्दही त्यांनी यावेळी ठाकरेंना दिला. खांडे यांच्यासह माजी पं.स.सदस्य किशोर काळकुटे, सरपंच गणेश घोडके, सरपंच रंजीत कदम, विभागप्रमुख राजाभाऊ नवले, सरपंच गणेश खांडे, महादेव पटेकर, रईस शेख, समीर बेग, तुषार शेंडगे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

---------

### अंबाजोगाई, परळीत शिवसेना इच्छुकांच्या

असतील. शिवसेना कार्यकर्त्यांच्या निष्ठेच्या जोरावर अंबाजोगाई व परळी नगर पालिकांमध्ये भगवा पुन्हा फडकेल, याची मला खात्री आहे असा विश्वास मुळूक यांनी व्यक्त केला. दरम्यान,अंबाजोगाई आणि परळी नगर पालिका निवडणुकीत शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी अशा पद्धतीने इच्छुकांची मुलाखत घेऊन पक्षांतर्गत शिस्त आणि पारदर्शकता यांचा उत्तम आदर्श ठेवला आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर पक्षाची ताकद नक्की वाढणार आहे.

---------------

### सीड्स बॉल: कृषी क्षेत्रात

अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर उपस्थित होते आणि मार्गदर्शक म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. हेमंत वैद्य यांनी पर्यावरण संरक्षण हीच ईश्वर सेवा आहे असे मानून प्रत्येकाने पर्यावरण संरक्षण करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. या उपक्रमाचे प्रस्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. सुहास मोराळे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रूपाली कुलकर्णी यांनी केले . याप्रसंगी व्यासपीठावर स्वा. सावरकर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे तसेच संस्थेच्या विद्यासभेचे उपाध्यक्ष उमेश जगताप उपस्थित होते. या पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण उपक्रमाच्या दुसऱ्या सत्रामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळ व हरित परिसर समिती यांच्या वतीने सीड्स बॉल संकल्पनेचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले यात बदाम, सिताफळ, रामफळ, चिंच, एरंडी, लिंब अशा उपयुक्त विविध झाडांच्या बिया चिखलांच्या गोळ्यांमध्ये ठेवून त्याचे बॉल कसे बनवले जातात व या माध्यमातून आपण पर्यावरण संरक्षण कसे करू शकतो याचे प्रात्यक्षिक विद्यार्थी विकास मंडळाचे प्रमुख प्रा. डॉ. गंगाधर उषमवार व भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. अशोक डोके यांनी विद्यार्थी व मान्यवरांना करून दाखवले. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. डॉ. जोगेंद्र गायकवाड, प्रा.पंडित शेंडगे, प्रा. डॉ.संतोष शिंदे, श्री सचिन चौरे व विविध सहकारी बंधूंचे सहकार्य लाभले.

----------

### कॅन्सर जनजागृतीसाठी रोटरीने

समारोप पोलिस स्टेशन येथे झाला. यावेळी अनेकांनी कॅन्सर जनजागृतीसाठी रोटरी क्लबला आर्थिक मदत केली. रोटरी क्लबच्या वतीने कॅन्सर रूग्णांची पुर्व तपासणी करण्यासाठी रोटरी क्लब मोबाईल व्हॅन उभी करणार आहे. यासाठी हा मदत निधी जमा करण्यात येत असल्याचे रोटरी क्बलच्या अध्यक्षा रोहिणी पाठक यांनी सांगितले. यावेळी कॅन्सर या आजारातून मुक्त झालेल्या रूग्णांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी त्यांच्या अनुभवाचे कथनातून जनजागृती केली. यावेळी रोटरी क्बलचे सदस्य, भारतीय जैन संघटना, स्व.प्रमोदजी महाजन नर्सिंग कॉलेज, कै.बाबुराव घुले नर्सिंग कॉलेज, गंगा नर्सिंग कॉलेज, राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी योगा सोहम योगा क्लास काळवटी मुडमॉर्निंग ग्रुप यांच्यासह शहरातील सामाजिक संस्था या उपक्रमात सहभागी झाल्या.

----------

### झेडपीत अतिरिक्त कामकाजच्या

प्रशासकीय किंवा विनंती बदलीनंतरही त्याच विभागात ठेवत आहेत. हा प्रकार विशेषतः शिक्षण, बांधकाम आणि आरोग्य विभागात प्रकर्षाने दिसत असून, अनेक कर्मचारी वर्षानुवर्षे त्याच ठिकाणी काम करत आहेत. काही विभागप्रमुख थेट सीईओ यांच्या नावावर फाइल पाठवतात, ज्यामुळे सामान्य प्रशासन विभागाची प्रक्रिया पूर्णपणे वगळली जाते. सीईओ यांच्या चांगुलपणाचा काही अधिकारी गैरफायदा घेत आहेत. सध्या जिल्हा परिषदेतील १०० हून अधिक कर्मचारी 'अतिरिक्त कामकाज'च्या नावाखाली महत्वाच्या टेबलवर बसले आहेत. या प्रकारामागे हितसंबंध आणि सत्ताधारी गटांचा हात असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी डॉ. ढवळे यांनी केली असून, लवकर कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

----------

### ..तर नगररोडचे काम

रस्त्याचे काम बंद करतो आणि जेथे आवश्यकता आहे त्या ठिकाणी करण्याचे आदेशित करतो. तेंव्हा आज जर का काम चालू राहिले तर मी ते काम बंद करून ज्या ठिकाणी गरज आहे त्याच ठिकाणी करण्याचा आग्रह मी रीतसर तक्रार वजा निवेदन पालकमंत्री, जिल्हाधिकारी व नगर परिषद सीओ यांच्या कडे देणार असल्याचे भाजपा युवा नेते संभाजी सुर्वे यांनी स्पष्ट केले आहे.

---------

### कॅशलेस पॉलिसी असून ग्राहकाकडून

वाहनाची दुरुस्ती छत्रपती संभाजीनगर येथील सोहम ह्युंदाई येथे करण्यात आली. यावेळी पॉलिसी कॅशलेस असूनही गाडी सोडविण्यापूर्वी सर्व्हिस सेंटरने तक्रारदाराकडून ६५ हजार रुपये रोख रक्कम वसूल केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला होता. या वसुलीविरोधात श्रीकांत मोराळे यांनी १९ नोव्हेंबर २०२३ रोजी बीड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे (प्रकरण क्र. ३००/२०२३) तक्रार दाखल केली. तक्रारदाराने म्हटले होते की, कॅशलेस पॉलिसीचा लाभ देण्याऐवजी चोला मंडलम जनरल इन्शुरन्स विमा कंपनीने जाणून बुजून ग्राहकाला आर्थिक तोट्यात आणले. कंपनीने सर्व्हिस सेंटरच्या माध्यमातून आमच्यावर अन्याय केला. विमा कंपनीच्या बाजूने प्रतिनिधींनी उत्तर दाखल करत दुरुस्ती खर्चातील तफावत व नियमांमुळे रक्कम घेण्यात आल्याचा युक्तिवाद केला; मात्र आयोगाने हे कारण अस्वीकार्य ठरवले. आयोगाने दि.२९ जुलै २०२५ रोजी दिलेल्या निर्णयात म्हटले आहे की, विमा कंपनीने तक्रारदारास ६५ हजार परत द्यावेत व तक्रार दाखल केलेल्या दि.१९ नोव्हेंबर २०२३ पासून प्रत्यक्ष देयकापर्यंत ९ टक्के वार्षिक व्याज द्यावे. तसेच, त्रास व खर्चपोटी १० हजार रुपये अदा करावे. अशा प्रकारे तक्रारदारास एकूण ८६ हजार ५०० रुपये मिळणार आहेत. आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करत संबंधित विमान कंपनीने आयोगाकडे सदरील रक्कम जमा केली आहे. दरम्यान, तक्रारदाराच्या बाजूने ॲड.नारायण सिरसट, ॲड.शिवराज कुंभार, ॲड.विकास मिसाळ, ॲड.बालाजी घुमरे, सहायक अक्षय सिरसट यांनी सहकार्य केले.

-------

### फार्मर आयडी असूनही नुकसानभरपाई

असे त्यांनी नमूद केले . फार्मर आयडी ही फक्त ओळख नव्हे , तर शासनाच्या सर्व कृषी योजनांचे डिजिटल दार आहे . शेतकऱ्यांच्या अचूक डेटामुळे शासनाला योग्य लाभ पोहोचवणे शक्य होते . मात्र ग्रामीण भागात अजूनही तांत्रिक अडचणी , जागरूकतेचा अभाव आणि माहितीचा अभाव ही समस्या आहे . प्रशासन , ग्रामसेवक आणि ई – सेवा केंद्र चालक यांनी गावागावात मोहीम राबवून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केल्यास , बीड जिल्हा राज्यात डिजिटल लाभ पूर्ण जिल्हा म्हणून ओळखला जाऊ शकतो . त्यामुळे जिल्हा प्रशासनाने पुढील आठवड्याभरात सर्व शेतकऱ्यांचे खाते तपासून शून्य प्रलंबित प्रकरण हे उद्दिष्ट साध्य करण्याचे ठरवले आहे .जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आवाहन केले की , राज्य शासनाची प्रत्येक मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे . फार्मर आयडीतील छोटीशी चूक मोठा अडथळा ठरते . प्रत्येक शेतकऱ्याने पुढाकार घेऊन स्वतःचा डेटा तपासावा , म्हणजे शासनाची मदत थेट त्यांच्या खात्यात पोहोचेल

----------

## पान १ वरून...

### सोयाबीन हमीभाव

तरीसुद्धा नोंदणी प्रक्रियेत झालेल्या विलंबामुळे शेतकऱ्यांना हमीभावाचा थेट फायदा मिळत नसल्याचे दिसत आहे. आगोदरच अतिवृष्टी आणि अनियमित हवामानामुळे पिकाला मोठा फटका बसला आहे. काही ठिकाणी चांगल्या दर्जाच्या वाणांना बाजारात थोडा भाव मिळत असला तरी शेतकऱ्यांना अपेक्षित दर मिळत नाही. त्यामुळे हमीभावाने खरेदी केंद्रांची तातडीने सुरुवात होणे अत्यावश्यक आहे.

-----------

### महाराष्ट्रात तीन दिवसापासून

चक्राकार वाऱ्यांची स्थिती कायम आहे. राज्यात दुपारच्या वेळी उन्हाची तीव्रता आणि उकाडा कायम आहे. तर पहाटे गारठा वाढला आहे. त्यामुळे सकाळी थंडी तर दुपारी उकाडा अशी स्थिती नागरिकांना अनुभवायला मिळत आहे. सोमवारी सकाळपर्यंतच्या २४ तासांमध्ये रत्नागिरी येथे ३३.५ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. धुळे येथील कृषि महाविद्यालय येथे राज्याचे हंगामातील नीचांकी ८.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तर जेऊर, जळगाव, निफाड येथील गहू संशोधन केंद्र आणि परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ येथे पारा १० अंशांच्या खाली घसरल्याने थंडीची लाट आहे. तापमानाचा पारा १० अंशाखाली घसरल्यास आणि तापमानात सरासरीपेक्षा ४.५ अंशांपेक्षा अधिक घट झाल्यास थंडीची लाट आली असे समजले जाते. राज्यात गारठा वाढत असून, सकाळच्या सुमारास धुक्यासह दव पडल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. राज्याच्या किमान तापमानात घट होत थंडीचा कडाका कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. मुंबई, पुणे, विदर्भ, मराठवाडा, जळगाव, कोकण या भागात गुलाबी थंडीची चादर पसरली आहे.

------------

### राजधानीतील स्फोटानंतर

सीएसटी येथे मोठा पोलिस बंदोबस्त असून सर्व सुरक्षा यंत्रणांना अलर्ट मोडवर ठेवण्यात आले आहे. सीएसटी येथे आरपीएफ आणि जीआरपी संयुक्तपणे तपासणी करत आहेत. तसेच संशयित प्रवाशाची बॅग किंवा वस्तूंची डॉग स्कॉडमार्फत चौकशी केली जात आहे. कुठलीही अप्रिय घटना होऊ नये याची खबरदारी घेतली जात आहे. तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये, सुरक्षा यंत्रणेला सहकार्य करावा, असे आवाहन पोलिसांतर्फे करण्यात येत आहे. तर दुसरीकडे पुणे पोलिस देखील अलर्ट मोडवर आले असून शहरात नाकाबंदी, लॉज चेकिंग, पेट्रोलिंग सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. मुंबईतील प्रसिद्ध देवस्थान सिद्धीविनायक मंदिरात देखील सुरक्षा वाढवण्यात आली आहे. बॉम्बस्फोटानंतर मंदिराचे कोषाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी यांनी तत्काळ सर्व सदस्यांची बैठक बोलावली आणि सुरक्षा आढावा संदर्भात पोलिस प्रशासनासोबत चर्चा केली. तसेच येणाऱ्या भाविकांची तपासणी सुरू करण्यात आली असून मंदिर परिसरात पोलिस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. याशिवाय अहिल्यानगर जिल्हा पोलिस अलर्ट मोडवर असून शिर्डीच्या प्रवेशद्वारासमोर नाकाबंदी करण्यात आली आहे.

----------

### आगामी निवडणुकीत भाजपाला

नेत्यांनी जीव तोडून काम करावे, अशा सूचनाही त्यांनी केल्या. याच धोरणात्मक बैठकीत नगराध्यक्षपदासाठी उमेदवारांच्या नावांवर सविस्तर चर्चा होऊन अनेक ठिकाणी नावे निश्चित करण्यात आली आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपाने पक्षांतर्गत सर्व यंत्रणा कामाला लावल्या. पक्षाच्या निरीक्षकांनी प्रत्येक नगर परिषद आणि नगर पंचायत क्षेत्रात भेटी देऊन स्थानिक पदाधिका-यांची मते जाणून घेतली. त्यानुसार नगराध्यक्षपदासाठी तीन संभाव्य उमेदवारांची यादी तयार करण्यात आली आणि ती जिल्हा प्रभा-यांकडे सुपुर्द करण्यात आली. आजच्या बैठकीत या यादीतील नावांवर सखोल चर्चा झाली, त्यातील बरीच नावे अंतिम करण्यात आली. विशेष म्हणजे निरीक्षकांनी सुचवलेल्या तीन नावांपैकी कोणता उमेदवार निवडून येण्याची अधिक शक्यता आहे, याचे स्वतंत्र सर्वेक्षण करण्यात आले. हे सर्वेक्षण अहवालही बैठकीत सादर करण्यात आले.

-------

### दिल्ली कार स्फोट प्रकरणाचा

मार्गदर्शनाखाली या स्फोटाचा तपास होणार आहे. दरम्यान, स्फोटाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी उच्चस्तरीय सुरक्षा आढावा बैठक घेतली. तत्पूर्वी गृहमंत्र्यांनी सांगितले होते की, सर्व शक्यतांचा शोध घेतला जात आहे आणि सर्व पर्याय विचारात घेऊन सखोल चौकशी केली जाईल.

**शाह यांनी राजीनामा द्यावा अन् घरी जावे – कॉंग्रेस**

दिल्लीच्या लाल किल्ल्यासमोर झालेल्या बॉम्बस्फोटांवरून राजकारण तीव्र झाले आहे. या बॉम्बस्फोटांवरून कॉंग्रेस पक्षाने केंद्र सरकारला घेरले आहे. उत्तर प्रदेश कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष अजय राय यांनी गृहमंत्री अमित शहा यांच्यावर निशाणा साधत, ते दावा करतात की घुसखोर घुसत नाहीत, मग या घटना कशा घडत आहेत? असा सवाल त्यांनी केला आहे. कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले, गृहमंत्री अमित शहा दावा करतात की घुसखोर घुसत नाहीत, मग या घटना कशा घडत आहेत? काही दिवसांपूर्वी पहलगाममध्ये आमच्या मुलांना मारण्यात आले. ते काय घडत आहे ते पाहत आहेत. तरीही, ते सांगत राहतात की ते सर्व काही ठीक करतील. यामुळे शाह यांनी राजीनामा द्यावा अन् घरी जावे, असे कॉंग्रेसने म्हटले आहे.

**षडयंत्र रचणाऱ्यांना सोडणार नाही – मोदी**

राजधानी दिल्लीत झालेल्या स्फोटामुळे संपूर्ण देशात हळहळ व्यक्त केली जात आहे. या स्फोटात १० हून अधिक लोक मारले गेले. पंतप्रधान मोदी हे दोन दिवसीय भूतान दौऱ्यावर गेले आहेत. दिल्लीतील स्फोटावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, दिल्लीतील या घटनेने सर्वांचे मन व्यथित आहे. मी पीडित कुटुंबाचे दुःख जाणतो, आज संपूर्ण देश त्यांच्यासोबत उभा आहे. दिल्ली स्फोटातील दोषींना कठोर शिक्षा दिली जाईल. या घटनेनंतर मी रात्रभर या घटनेशी जोडलेल्या अधिकाऱ्यांसोबत, यंत्रणेसोबत संपर्कात होतो. घटनेशी निगडित सर्व धागेदोरे जोडले जात आहे. आमच्या तपास यंत्रणा या घटनेच्या मुळाशी जातील. या घटनेमागील षडयंत्र करणाऱ्यांना सोडले जाणार नाही असा इशारा त्यांनी दिला.

-------------

### मनसेसोबतच्या युतीसंदर्भात

बोलताना कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, राज्यात नगरपालिका व नगरपंचायतीच्या निवडणुका जाहीर झाल्या असून, आतापर्यंत ३५ हजार इच्छुक उमेदवारांचे अर्ज आलेले आहेत. या अर्जांची छाननी सुरु असून १२ तारखेला राज्य पार्लमेंटरी बोर्डाची बैठक होत आहे, या बैठकीत उमेदवारांसंदर्भात निर्णय घेतला जाईल. मुंबई महानगरपालिका निवडणुकीबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मुंबई महानगरपालिका निवडणूक स्वबळावर लढावी अशी अनेक नेते, पदाधिकारी व पक्ष कार्यकर्त्यांची भावना आहे, अशा भावना वेळोवेळी व्यक्त केलेल्या आहेत पण अद्याप मुंबई महानगरपालिकेची निवडणूक जाहीर झालेली नाही, निवडणूक जाहीर झाली की त्यासंदर्भातील निर्णय घेतला जाईल असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

----------

### धोंडे, खांडे,क्षीरसागर

असलेल्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये मंगळवारी प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशामुळे आष्टी पाटोदा शिरूरमध्ये अजित दादांच्या राष्ट्रवादीला ताकद मिळेल यात शंका नाही. दुसरी बाब म्हणजे भाजपमध्ये राहून विरोध करण्यापेक्षा इतर पक्षाला ताकद देऊन स्वतःचे अस्तित्व पुन्हा निर्माण करण्यासाठी धोंडे यांनी राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला असल्याचे बोलले जात आहे. यासोबतच दुसरे कुंडलिक खांडे यांनी गेल्या लोकसभा आणि विधानसभेमध्ये पक्षाच्या विरोधात केलेले काम त्यांच्या अंगलट आले होते. लोकसभेला राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचे काम केले असल्याने त्यांना पक्षातून काढण्यात आले होते. त्यानंतर विधानसभेला त्यांनी स्वतः छत्रपती संभाजी राजे यांच्या स्वराज्य संघटनेकडून निवडणूक लढवली होती. शिवसेनेतून बाहेर पडल्यामुळे फारशी ताकद आली नाही, मात्र आता दोन वर्षाचा कालखंड उलटल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत असलेले कुंडलिक खांडे यांनी पुन्हा मूळ उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत मंगळवारी प्रवेश केला. पद कोणतेही दिले नसले तरी शिवसेनेमध्ये प्रवेश झाल्याने त्यांना आता पदाची अपेक्षा वाढलेली दिसत आहे. यासोबतच बीडमध्ये राजकारणात क्षीरसागर कुटुंब महत्त्वाचे ठरलेले आहे. त्याच कुटुंबातील एक सदस्य म्हणजेच आमदार संदीप क्षीरसागर यांचे सख्खे बंधू नगरपालिकेचे माजी उपाध्यक्ष हेमंत क्षीरसागर यांनी भाजपाचे कमळ हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे. एक बंधू राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाकडे तर दुसरे चुलत बंधू राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाकडे आहेत. आता या ज्यनियर क्षीरसागर यांनी भाजपचा झेंडा हाती घेतल्याने एकाच कुटुंबामध्ये तिन्ही पक्षाचे कार्यकर्ते दिसणार आहेत. यावर मात्र कुटुंबातील ज्येष्ठ माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी आणखी आपले पत्ते ओपन केलेले नाहीत, त्यामुळे सध्या बीडमध्ये जयदत्त क्षीरसागर यांच्या भूमिकेकडे लक्ष लागून आहे. मात्र माजी आमदार भीमराव धोंडे, कुंडलिक खांडे यांनी राजकीय पक्षाचा आसरा घेतला आहे.

-------------

### स्टॅम्प ड्युटी सवलतींची आता दर

जमीन नोंदणी प्रकरणातील ढिसाळपणाचा मोठा वाटा आहे. या प्रकरणाच्या प्राथमिक तपासात स्टॅम्प ड्युटीच्या नुकसानीसह इतर चुका आढळून आल्या होत्या. त्यानंतर राज्य सरकारने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन केली आहे. परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे की, २०१४ मध्ये विभागाने आणलेली तात्काळ तपासणीची पद्धत काटेकोरपणे पाळली जात नव्हती. त्यामुळे आता नव्याने निर्देश देण्यात आले आहेत. तपासणीदरम्यान कोणतीही अनियमितता किंवा कमतरता आढळल्यास ती त्वरित विभागाला कळवावी आणि दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईच्या शिफारशीसह अहवाल सादर करावा, असेही सांगितले आहे. सध्या जमीन व्यवहार आणि स्टॅम्प ड्युटी सवलतींवर सरकारची विशेष नजर आहे. पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्याशी निगडीत प्रकरणामध्ये जास्त किमतीच्या सरकारी जमिनीच्या व्यवहारांमध्ये अधिकारांचा दुरुपयोग झाल्याचे समोर आले होते, ज्यामुळे काही अधिकाऱ्यांना निलंबितही करण्यात आले. आता उपनोंदणी अधिकारी स्टॅम्प ड्युटी सवलत किंवा सूट संबंधित सर्व कागदपत्रे संबंधित मुद्रांक अधिकाऱ्यांकडे दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करतील.

-----------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि.१२ नोव्हेंबर २०२५



## ॲथलेटिक चॅम्पियनशिपमध्ये दत्ता झोडगेची सोनेरी कामगिरी

बीड । प्रतिनिधी

चऱ्हाटा (ता. बीड ) या क्रीडामय भूमीचा सुपुत्र दत्ता झोडगे याने चेन्नई येथे दि. ०५ ते ०९ नोव्हेंबर दरम्यान पार पडलेल्या २३व्या 'एशिया मास्टर्स ॲथलेटिक चॅम्पियनशिप २०२५' मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करताना ४१०० मीटर रिलेस्पर्धेत सुवर्णपदक पटकावून अभूतपूर्व कामगिरी केली आहे. या उल्लेखनीय यशामुळे चऱ्हाटा गाव, बीड जिल्हा, महाराष्ट्र राज्यासह भारताचा झेंडा आंतरराष्ट्रीय स्तरावर अभिमानाने फडकला आहे. दत्ता झोडगे हा गेल्या अनेक वर्षांपासून धावण्याच्या क्षेत्रात सातत्याने परिश्रम घेणारे, जिद्दी व शिस्तप्रिय खेळाडू म्हणून ओळखले जातात. त्यांनी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये भाग घेऊन पदकांची श्रीमंती मिळवली आहे. सदरील स्पर्धा ही आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक स्पर्धा सुरू असून त्यामध्ये भारतासह आशियातील विविध देशांमधून दोन हजारापेक्षा जास्त ॲथलेटिक्स खेळाडूंनी सहभाग नोंदवला.

# चौसाळा येथे मोटरसायकलच्या धडकेत शाळकरी मुलगी जखमी


## मोंढा रोड वर तात्काळ गतिरोधक बसवा अन्यथा जन आंदोलन-विवेक कुचेकर

बीड

बीड तालुक्यातील चौसाळा येथील गोरे इंग्लिश स्कूल या शाळेत इयत्ता दुसरी मध्ये शिकणारी राधिका महेश पवार ही मुलगी शाळा सुटल्यानंतर शाळेच्या बसने आपल्या घराकडे जात असताना आठ नोव्हेंबर शनिवार रोजी चार वाजून दहा मिनिटाच्या दरम्यान सदरील बस चौसाळा - मोंढा रोडवर डॉ. पोथरकर यांच्या जुन्या दवाखान्यासमोर थांबलेली होती.

बस थांबल्यानंतर त्यामधून मुलगी उतरली व आपल्या घराकडे रस्ता क्रॉस करत असताना स्कूल बसच्या पाठीमागून आलेल्या अज्ञात दुचाकी स्वराने सदरील मुलीला धडक दिली.

त्यावेळी सदरील मुलीच्या अंगावर दुचाकी पडल्याने त्यामध्ये मुलगी जखमी झाली असून त्यावेळी आसपासच्या काही तरुणांनी रस्त्यावर मुलीच्या अंगावर पडलेल्या मोटर सायकलला




उचलून बाजूला केले. आणि मुलीला उचलले. सदरील मुलीच्या पाठीवर शाळेचे दप्तर असल्याने सदरील मुलीला दुचाकीने धडक दिल्यानंतर ती त्या दप्तरावर पडल्यामुळे मोठा अनर्थ टळला. परंतु तिच्या डोक्याला व हाताला मार लागलेला आहे. त्यावेळी सदरील दुचाकीस्वार घटनास्थळावरून पसार झाला.

चौसाळा शहरातुन जाणारया मोंढा रोड वर तात्काळ गतिरोधक बसवण्याची गरज सदरील रस्त्यावर यापूर्वीही एका युवकाला भरधाव आलेल्या दुचाकीने धडक दिल्यामुळे युवकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. सदरील रस्ता हा कायम रहदारीचा असल्याने या ठिकाणी अशा घटना वारंवार घडत असल्याने या रस्त्यावर आवश्यक त्या ठिकाणी गतिरोधक बसवण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर यांनी केली आहे या रस्तयावर तात्काळ गतिरोधक न बसविल्यास जन आंदोलन करणार असल्याची माहीती सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर यांनी केली आहे.

## गुरुकृपा कॉलेज येथे नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ संपन्न




माजलगाव

महाराष्ट्र सीईटी सेलने फार्मसीची सुरू केलेली प्रवेशाची अंतिम प्रक्रिया संपत आलेली आहे या पार्श्वभूमीवर गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी, माजलगाव या महाविद्यालयात डी फार्मसी आणि बी फार्मसी प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी इंडेक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले होते. कॉलेजचा पहिल्या दिवशीच आयोजित अकॅडमिक इंडक्शन प्रोग्राम हा वर्षभर चालणाऱ्या सिलॅबस आणि कॉलेजचे एक्स्ट्रा ॲक्टिव्हिटीस याबद्दल माहिती देण्यासाठी असतो. गुरुकृपा महाविद्यालय आयोजित या प्रोग्राम मध्ये बायनेट फार्मा कंपनीचे डायरेक्टर माननीय श्री. बालाजी सांगळे यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलाविण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना फार्मसी मधील विविध करिअर संधीची माहिती सांगितली. कॉलेजच्या पहिल्या दिवशीच तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन मिळणे हे दुर्मीळच पहायला मिळते. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांत उत्सास वाढला.

सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन सानिया पठाण व साक्षी तोर या विद्यार्निनीने केले तर प्रास्ताविक प्राचार्य अमित बिंदू यांनी केले. या कार्यक्रमात प्रा. गणेश वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना कॉलेज स्टाफची ओळख करून दिली, अकॅडमिक कॅरिक्युलम आणि एक्झाम बद्दल प्रा. ऋषिकेश शेंडगे आणि प्रा. दिवाकर जगताप यांनी माहिती सांगितली त्याच बरोबर प्रा. राहुल वांडरे यांनी जॉब संदर्भात माहिती दिली तसेच इन्स्टिट्यूटिनल ओव्हर व्हिव आणि रिचर्स संदर्भात प्रा. डॉ. निखिल जाधव यांनी गायडन्स केले. प्रमुख पाहुण्यांच्या मार्गदर्शनानंतर संस्थेचे अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले यांनी विद्यार्थ्यांना तांत्रिक गोष्टी शिकण्याचे आव्हान करत अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्श दीपाली गायकवाड हिने केले. या कार्यक्रमाचा साठी प्र. पाहुणे म्हणून फिजिओथेरपीचे प्राचार्य मकेश बाबू, आयुर्वेदचे विभाग प्रमुख डॉ. साबेर शेख, नर्सिंगच्या प्रा. पूनम खानापूरकर उपस्थित होते.

## अंजली चव्हाण विभागीय भालाफेक क्रीडा स्पर्धेतून द्वितीय




वडवणी । प्रतिनिधी.

युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद परभणी व परभणी जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि.०८ नोव्हेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर विभागीय स्तरीय मैदानी शालेय क्रीडा स्पर्धा मानवत या ठिकाणी संपन्न झाली. या स्पर्धेत वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता- १२ वी विज्ञान शाखेची विद्यार्थिनी कु.अंजली देविदास चव्हाण हिची १९ वर्षे वयोगटातील मुलींच्या भालाफेक क्रीडा स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावून राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली तसेच चि.अभिषेक विलास भुजबळ याचा १५०० मीटर धावण्यामध्ये तृतीय क्रमांक आला या कामगिरीमुळे शाळेचे नाव विभागामध्ये व राज्यांमध्ये रोशन झाले आहे. शाळेचे क्रीडा विभाग प्रमुख श्री.निवरकर सर व क्रीडा शिक्षिका श्रीमती दिवे मॅडम यांच्या सततच्या मार्गदर्शनाखाली हे यश त्यांनी संपादन केले.

या यशाबद्दल संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक सचिव,माजी आमदार केशवराव आंधळे , विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा बीड भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय भाऊ आंधळे,वडवणी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक रणजीत भैय्या धस,संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे यांनी अभिनंदन करून स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यालयाच्या वतीने शालेय समितीचे अध्यक्ष तथा बीड भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय भाऊ आंधळे यांच्या शुभहस्ते ट्रॅक सूट व शूज ,शाल भेट देऊन सोमवार दि.१० नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यालयामध्ये सत्कार करण्यात आला. या प्रसंगी विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती एस.के.आंधळे/ डोईफोडे,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,अर्थ विभाग प्रमुख श्री.डोईफोडे सर, श्री. प्रदीप काळे सर,प्रा.मुंडे सी. व्ही.,प्रा.अंडील जी.पी., प्रा. डाके,प्रा.संजय केदार,प्रा.कचरे मॅडम यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक,शिक्षिका,प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून (डेरवण) रत्नागिरी या ठिकाणी होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## डॉ.कपूर यांच्या निवासस्थानी घरपोच 'ज्ञानेश्वरी ग्रंथ स्नेह भेट'

बीड । प्रतिनिधी

माऊलीम महावैष्णव संत श्री.ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'ज्ञानेश्वरी ग्रंथ घरपोच स्नेह भेट' या उपक्रमाचा एक प्रेरणादायी आणि भक्तिमय सोहळा काल दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी गोरज मुहूर्तावर दुबे कॉलनी, खंडेश्वरी रोड येथे डॉक्टर विक्रमसिंह कपूर यांच्या निवासस्थानी मोठ्या आनंदात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या प्रसंगी कपूर कुटुंबाने ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पूजन केले. दारात रांगोळी काढण्यात आली होती. दिव्यांची माळ आणि फुलांची आरास करून वातावरण प्रसन्न व भक्तिम झाले होते. ''ज्ञानदेव तुकाराम'' या जयघोषात आणि हरिनामाच्या गजरात छोटी दिंडी काढून ज्ञानेश्वरी ग्रंथाचे स्वागत करण्यात आले. कपूर दांपत्याने भक्तीभावाने ग्रंथाचे पूजन पूजन केले.



यानंतर ह.भ.प. माधव महाराज डाके (बीड) यांच्या हस्ते ज्ञानेश्वरी ग्रंथाची विधीवत पूजा करण्यात आली. पंचारती प्रज्वलित दिव्याच्या पिवळसर मंद प्रकशात करून श्री श्री ज्ञानेश्वरी प्रवचनाची सुरुवात झाली.आपल्या मार्गदर्शनपर प्रवचनात ह.भ.प. माधव महाराज डाके म्हणाले की ''ज्ञानेश्वरी हा नित्य आनंद देणारा ग्रंथ आहे. जो कोणी या ग्रंथाच्या सानिध्यात येतो, त्याच्या मनातील चिंता आणि दु:ख दूर होते. प्रत्यक्ष माऊली आपल्या भक्तांच्या पाठीशी उभी राहते. अडचणी, संकटे आणि भ्रम दूर करून जीवनाला नवा अर्थ देते. ज्ञानेश्वरी हा केवळ ग्रंथ नाही तर जीवनाला मार्गदर्शन करणारा दिवा आहे. या दिव्याच्या प्रकाशात आपले जीवन उजळून टाका''असे म्हटले या प्रसगी डॉ. कपूर कुटुंबातील विक्रमसिंह कपूर , वर्षा कपूर, श्रद्धा ताई चौहाण,अनिताताई सादरे,हनुमान सदरे,श्रुती कपूर, पूर्वी कपूर, जागृती कपूर, व सर्व सदस्य, दुबे कॉलनीतील माता-भगिनी, तसेच लहान मुले उपस्थित होती. सर्वांनी हरिनाम गात भक्तीमय वातावरण निर्माण केले. कार्यक्रमात ज्ञानेश्वरी ग्रंथ घराघरांत पोहोचविण्याच्या या उपक्रमाचे महत्त्व आणि उद्दिष्ट याविषयीही चर्चा झाली. कार्यक्रमाची सांगता 'पसायदान' पठणाने झाली. ''जे सुकृत आहे त्याची फळे लाभोत, सर्व लोक सुखी होवोत'' असा मंगल संकल्प व्यक्त करण्यात आला. महादेव नाना साळुंके यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी या कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करत ''ज्ञानेश्वरी घरपोच ग्रंथ भेट'' हा उपक्रम प्रचार आणि प्रसार ,समाजाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी राबविण्यात येत असल्याचे सांगितले. त्यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानून या उपक्रमाला पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमानंतर उपस्थित सर्वांनी प्रसादाचे सेवन करून भक्तिमय वातावरणात सोहळ्याची सांगता झाली.

## सैनिकी विद्यालयात आद्य क्रांतिकारक राघोजीराव भांगरे यांची जयंती

बीड । प्रतिनिधी

सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड येथे आद्य क्रांतिकारक राघोजीराव भांगरे यांची जयंती साजरी करण्यात आली अशी माहिती प्राचार्य श्री सचिन पवार सर यांनी दिली.

सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य सचिन पवार यांच्या अध्यक्षतेखाली आद्य क्रांतिकारक राघोजीराव भांगरे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी राघोजीराव भांगरे यांच्या कार्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले तर प्राचार्य श्री पवार सर यांनी राघोजीराव



भांगरे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . यावेळी सैनिकी विद्यालयातील उपप्राचार्य रवींद्र झोडगे व उप मुख्याध्यापक महेबूब पठाण सर व विद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नामदेव साळुंखे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री गणेश निर्मळ सर यांनी केले.

## सावता परिषद माळी समाजाचा आवाज बुलंद करणारी संघटना - डॉ.राजीव काळे



बीड । प्रतिनिधी

माळी समाजाच्या न्याय - हक्क, सन्मान व प्रगतीसाठी कार्यरत असलेली सावता परिषद हा समाजाचा आवाज आहे. सामाजिक शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील प्रबोधन करण्याचे काम सावता परिषद प्रामाणिकपणे करत असल्याचे प्रतिपादन सावता परिषदेचे प्रधान महासचिव तथा संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हा निरीक्षक डॉ.राजीव काळे यांनी व्यक्त केले.

सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांच्या सूचनेनुसार राज्यातील विविध जिल्ह्यात जिल्हा निरीक्षकांच्या प्रमुख उपस्थितीत सावता परिषदेच्या बैठका होत आहेत. छत्रपती संभाजीनगर येथे जिल्ह्याचे निरीक्षक डॉ.राजीव काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी पुंडलिक नगर येथील हॉटेल नानाज येथे सावता परिषदेची जिल्हा आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.राजीव काळे म्हणाले की, सावता परिषद ही माळी समाजातील लढाऊ व सक्रिय संघटना आहे. गेल्या अनेक वर्षांपासून माळी समाजाच्या हिता अस्मितेच्या प्रश्नांचा जागर सावता परिषदेच्या माध्यमातून होत आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यात कार्यरत असणारी ही माळी समाजाची सर्वात मोठी व तरुणांची संघटना म्हणून सावता परिषदेकडे पाहिले जाते. पदाधिकाऱ्यांच्या मजबूत संघटनांवर संघटनेची दिशा ठरलेली असते त्यामुळे मजबूत संघटन उभा करणे गरजेचे आहे. आगामी काळातील होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पदाधिकाऱ्यांनी जागरूक रहावे. न्याय मिळत नसेल तेथे उपद्रव मूल्य दाखवावे. यावेळी मंचावर सावता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष शिवानंद झोरे, युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रविण गाडेकर, महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा शारदाताई कोथिंबीरे, सोशल मीडिया राज्य प्रभारी ज्ञानेश्वर भोपळे, मराठवाडा उपाध्यक्ष भाऊसाहेब वाघमारे, मराठवाडा मुख्य संघटक रामदास शेळके, माजी नगरसेवक विजय वाघमारे आदीजण उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा कार्याध्यक्ष विलास ढंगारे यांनी केले तर प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष बाबासाहेब जाधव व आभार प्रदर्शन महिला आघाडी जिल्हाध्यक्षा रोहिणी काळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी युवा आघाडी जिल्हाध्यक्ष शैलेश इंगळे, महानगर जिल्हाध्यक्ष साईनाथ जाधव, महिला आघाडी जिल्हा कार्याध्यक्षा आशा गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष भालचंद्र गायकवाड, जिल्हा मुख्य संघटक प्रभुराम जाधव, जिल्हा सचिव गोपीचंद खराडे, तालुकाध्यक्ष तानाजी गाडेकर, रोहित भोपळे, पुंजाराम भोपळे, सौरभ जाधव आदींनी प्रयत्न केले.

### जाहिरनामा

**मा.श्रीमती एस.डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १६७२/२०२५**

**विधीज्ञ : श्री.ए.एस. ठोसर**

**कैकयी यादव खरसाडे वि. निरंक**

मागणीः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदारः १. कैकयी भ्र. यादव खरसाडे, वयः ६० वर्षे, धंदाः घरकाम, रा. आहेरवडगांव ता.जि.बीड, २. यादव पि. संतराम खरसाडे, वयः ७१ वर्षे, धंदाः शेती, रा. आहेरवडगांव ता.जि.बीड, वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे भरत पि. यादव खरसाडे, राहणार आहेरवडगांव ता.जि. बीड हे दिनांक ३१/०८/२०२५ रोजी लोटस मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची आई असून अर्जदार क्र. २ हे मयताचे वडील आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत. मयत नामे भरत पि. यादव खरसाडे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत भरत पि. यादव खरसाडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख १५/१२/२०२५ आहे.

आज दिनांक ११/११/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**क. लिपीक**
सह दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

आदेशावरून
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच बीड जिल्हा कार्यालय
शाहूनगर पांगरी रोड, बीड ४३११२२
दिनांक ११/११/३०२४, जा.क्र.जि.प्रा.म./बीड / १८०८

### जाहिर प्रगटन

CONSUMER CASE NO. DC/470/CC/878/2024 WITH VINAYAK HARIBHAU GADEKAR
Versus
DNYANRADHA MULTISTATE CO-OP CREDIT SO.LTD
To. Opposite Party / Respondent Name:
1. DNYANRADHA MULTISTATE CO-OP CREDIT SO.LTD
MAIN BRANCH DNYANARADHA BHAWAN, JALNA ROAD, BEED DIST. BEED.431122, MAHARASHTRA BEED- 2. CHAIRMAN SURESH DNYANOBA KUTE DNYANRADHA MULTISTATE CO-OP CREDIT SO.LTD NEAR CHADA FAKTI, M.I.D.C. BEED TQ DIST. BEED.431122, MAHARASHTRA BEED-
3. BRANCH MANAGER DNYANRADHA MULTISTATE CO-OP CREDIT SO.LTD. BRANCH SHIRUR KASAR TQ. SHIRUR KASAR DIST. BEED., MAHARASHTRA BEED-

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २९/१२/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक ११/११/२०२५
ठिकाण - बीड

स्वाक्षरित
**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड.

जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच बीड जिल्हा कार्यालय
शाहूनगर पांगरी रोड, बीड ४३११२२
दिनांक ११/११/२०२५ जा.क्र.जि.ग्रा.स.// १८०७

### जाहिर प्रगटन

CONSUMER CASE NO. DC/470/CC/877/2024 WITH PRAKASH SHRIRAM TAMBAT
Versus
DNYANRADHA MULTISTATE CO-OP CREDIT SO.LTD
To, Opposite Party/ Respondent Name:
1. DNYANRADHA MULTISTATE CO-OP CREDIT SO.LTD
MAIN BRANCH GDNYANARADHA BHAWAN, JALNA ROAD, BEED TO DIST. BEED.431122. MAHARASHTRA BEED-
2. CHAIRMAN SURESH DNYANOBA KUTE DNY ANRADHA MULTISTATE CO-OP CREDIT SO.LTD NEAR CHADA FAKTI, M.I.D.C. BEED TO DIST. BEED.431122, MAHARASHTRA BEED-
3. BRANCH MANAGER DNYANRADHA MULTISTATE CO-OP CREDIT SO.LTD BRANCH SHIRUR KASAR TO. SHIRUR KASAR DIST. BEED., MAHARASHTRA BEED-

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २९/१२/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी. मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुगार,

दिनांक ११/११/२०२५
ठिकाण - बीड

स्वाक्षरित
**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
बुधवार दि.१२ नोव्हेंबर २०२५



# एकरी ७ कोटी रुपये द्या; पुरंदर विमानतळ भूसंपादनावरून शेतकरी आक्रमक

पुणे : पुरंदर विमानतळ भूसंपादनाचा तिढा दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. मोक्याची जमीन विमानतळाला देण्यासाठी जास्तीत जास्त रक्कम मिळावी यासाठी शेतकरी आक्रमक आहेत. या विमानतळाच्या भूसंपादनासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी एकरी एक कोटी रुपयांचा भाव सांगितला आहे. मात्र, एक कोटींमध्ये काहीच होणार नाही, कारण या विमानतळामुळे आम्हाला कायमचे विस्थापित व्हावे लागणार आहे. आमच मोठे नुकसान होणार आहे. त्यामुळे आम्हाला कमीत कमी ७ ते ८ कोटी रुपये हवेत यासाठी शेतकरी आक्रमक झाले आहेत.

हे नवीन विमानतळ पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, पारगाव, एखतपूर, खानवडी, मुंजवडी या सात गावात होणार आहे.



यासंदर्भांत जमिनीच्या मोजणीची प्रक्रिया नुकतीच पूर्ण झाली आहे. त्यानंतर काही दिवसांत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी यांनी प्रकल्प बाधित शेतकऱ्यांची बैठक घेवून एकरी एक कोटी रुपये त्याचप्रमाणे शेतातील विहीर, फळबागा, झाडे अशा गोष्टीसाठी दुप्पट भाव देणार असल्याचे सांगितले होते. मात्र शेतकरी या मदतीवर खुश नाहीत. वनपुरी येथे याबाबत शेतकऱ्यांची एक बैठक पार पडली. या बैठकीनंतर शेतकऱ्यांनी म्हटले की, २०२३ मध्ये उदाचीवाडी येथे ८० लाख रुपये प्रति एकर असा व्यवहार झाला होता. शासनाच्या नियमानुसार त्या व्यवहाराच्या पाच पट दराने किमान चार कोटी रुपये एकरी दर व्हायला हवा. तसेच रिंग रोडसाठी शासनाने प्रति गुंठा १४ ते १५ लाख रुपये दिले असून, म्हणजेच एकरी सुमारे सहा कोटी रुपये होतात. पुरंदर विमानतळामुळे आमच्या हक्काच्या जमिनी जाणार आहते, आम्हाला कायमचे विस्थापित व्हावे लगणार असून आमची गुरे ढोरे, शेतजमीन, घरे, झाडे या गोष्टी सोडून जावे लागणार आहेत. कुटुंबातील लोकांची संख्याही जास्त आहे. त्यामुळे पैशांचे योग्य पद्धतीने वाटप करण्यात अनेक अडचणी निर्माण होऊ शकतात.

अशावेळी एक कोटी रुपयाने काहीच होणार नाही. आम्हाला ७ ते ८ कोटी रुपये प्रति एकर पाहिजेत. आम्हाला एवढे पैसे दिले तर या विमानतळाचा आमचा कोणताही विरोध नसेल. आम्ही शासनाला संपूर्ण सहकार्य करू अशी भूमिका विमानतळ प्रकल्प बाधित शेतकऱ्यांनी मांडली आहे. तसेच जर आमच्या मागण्या मान्य झाल्या नाही तर मग जिल्हाधिकारी तसेच मुख्यमंत्री यांच्या कोणत्याही बैठकांना आम्ही उपस्थित राहणार नाही आणि पुन्हा एकदा आंदोलन करू असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.

## हिवाळ्यात जनावरांची ‘अशी’ घ्या काळजी



हिवाळा हा ऋतू पशुधनासाठी आरोग्यदायी असला तरी सध्या राज्यात दिवसा उन्ह आणि रात्रीच्या वेळी थंडी असे विषम वातावरण आहे. लहान करडे, कोकरे, वासरे यांचे थंडीपासून संरक्षण करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर व्यायला आलेल्या जनावरांची काळजी घेणे गरजेचे आहे.

हिवाळयात जनावरांची काळजी : जनावरांच्या गोठ्यांना बारदान किंवा शेडनेटचे पडदे लावावेत. गोठ्यामध्ये उष्णता टिकून राहण्यासाठी ५०० ते १००० वॅटचे बल्ब गोठ्यामध्ये कमी उंचीवर लावावेत. शक्य झाल्यास गोठ्यामध्ये शेकोटी पेटवावी. गाभण जनावरांना व छोटय़ा जनावरांना रात्रीच्या वेळी वाळलेले गवत/ कडबा/ गोणपाट यांची बिछायत टाकावी. गोठा कोरडा राहील याची कटाक्षाने काळजी घ्यावी, यासाठी दर ८ ते १० दिवसांनी गोठ्यामध्ये चुना भुरभुरावा. थंडीचे प्रमाण जास्त वाढल्यास जनावरांच्या अंगावर गोणपाट बांधावे. विशेषतः: गाभण गायी म्हशींची जास्त काळजी घ्यावी. जनावरांना जास्तीत जास्त उर्जा मिळवण्यासाठी जनावरांच्या आहारात शेंगदाणा पेंड, सरळी पेंड यांचा वापर करावा. शक्य असल्यास बायपास फॅट व प्रथिनेयुक्त आहार द्यावा. क्षार व जीवनसत्वांचे मिश्रण वाढवावे. सकाळच्या वेळी हिरवा चारा व रात्रीच्या वेळी वाळलेला चारा द्यावा. चराऊ जनावरांना चरायला नेताना सकाळी उशिरा न्यावे जेणेकरून गवतावर दव नसेल. गोगलगाईचा प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी जनावरे चरावयास नेऊ नयेत.

सर्दीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास जनावरांच्या नाकाभोवती टर्पेन्टाइनचा बोळा फिरवावा. सर्दीचा रंग हिरवट पिवळसर असल्यास तातडीने पशुवैद्यकाचा सल्ला घ्यावा. जनावरांचे पिण्याचे पाणी अति थंड नसावे. जनावरे धुवायची झाल्यास शक्यतो दुपारच्या वेळी धुवावीत. जनावरांना लाळ्या खुरकुत आजारापासून संरक्षणासाठी लसीकरण करावे.

## पपईवरील बुरशी; वेळीच काळजी घ्या नाहीतर होईल नुकसान

बरेच शेतकरी वेगवेगळ्या प्रकारचे फळबागांची लागवड करतात. यामध्ये पपई लागवडीचे प्रमाण देखील खूपच आहे. महाराष्ट्राच्या जवळजवळ सर्वच भागांमध्य पपई लागवड केली जाते. तसे पाहायला गेले तर पपई लागवडीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना चांगला नफा देखील मिळतो. परंतु बऱ्याचदा असे होते की, हवामानात अचानक बदल किंवा इतर कारणांमुळे पपई फळ पिकावर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होतो. परंतु यामध्ये बुरशीच्या वेगवेगळ्या प्रकारांपैकी अँथ्रॅकनोज बुरशी सर्वात घातक आहे.

अँथ्रॅकनोज बुरशी : अँथ्रॅकनोज हा महत्त्वाचा बुरशीजन्य रोग आहे. कोलेटोट्रिकम ग्लोईओस्पोरी ऑईड्स नावाच्या जमिनीत राहणार या बुरशीमुळे हा रोग होतो. ही बुरशी जमिनीवरील पिकांच्या अवशेषांमध्ये जिवंत राहते.अनुकूल हवामानामध्ये निरोगी, जखम झालेल्या फळांवर वाऱ्याच्या माध्यमातून किंवा पावसाच्या पडणाऱ्या पाण्यामुळे पसरते. मध्यम तापमान, अतिशय उच्च आद्रता आणि जमिनीचा कमी सामू या रोगाच्या वाढीसाठी अनुकूल असतात. कडक ऊन, कोरडी हवा किंवा अतिशय जास्त तापमान या बुरशीच्या वाढीसाठी प्रतिकूल आहे. सगळ्यात महत्वाचे म्हणजे या बुरशीला तिचे जीवनचक्र पूर्ण करण्यासाठी लागन झालेली फळे एका विशिष्ट प्रमाणात पर्यंत पिकणे गरजेचे आहे.

या बुरशीचे लक्षणे : अँथ्रॅकनोज बुरशी पानांवर व देठावर दिसते. असे असले तरी हा प्रामुख्याने फळांचा रोग आहे. झाडाच्या च्या ज्या पानांवर या बुरशीचा प्रादुर्भाव होतो व त्यामुळे पानाच्या कडा गडद पिवळी दिसतात. काही काळाने हे डाग एकमेकांमध्ये मिसळल्या सारखे दिसतात व मोठे होतात. पानांवर करपलेले भाग तयार होतात. अगदी



प्रादुर्भाव होण्याच्या सुरुवातीच्या काळात फळांच्या सालीवर लहान व फिकट रंगाचे ठिपके दिसतात. परंतु फळे जेव्हा पिकायला येतात तेव्हा हे डाग मोठ्या आकाराचे, गोल गडद तपकिरी रंगाचे होतात.

बुरशीवर जैविक नियंत्रण : यावर बॅसिलस सबटिलिस आधारित बुरशीनाशक वापरले तर चांगला परिणाम दिसून येतो. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे बियाण्यावर किंवा फळांवर गरम पाण्याचे उपचार म्हणजे जवळजवळ ४१ डिग्री सेल्सिअस गरम पाण्यात २० मिनिटे बुडवून ठेवले तर बुरशीचे काही अवशेष राहिले असतील तर ते मरतात आणि रोगाचा प्रसार शेतात किंवा इतर मार्गांनी निरोगी झाडांवर किंवा पानांवर होत नाही. जेव्हा आपण झाडावरून एकादस संक्रमित भाग काढतो तेव्हा त्या जागीबोर्डो पेस्ट लावावी. १० ते १२ दिवसांच्या अंतराने लागोपाठ तीन वेळा फवारणी करणे गरजेचे असते. जर रासायनिक उपचार करायचे असेल तर त्यामध्ये क्लोरोथँलोनील, अझोक्सीस्टरॉबिन किंवा कॉपर सल्फेट असणाऱ्या बुरशीनाशकांची लागोपाठ तीन वेळा १० ते १२ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. जेव्हा आपण बीजप्रक्रिया करतो तेव्हा सुद्धा बुरशीनाशक वापरणे गरजेचे आहे.

## फळबागांमध्ये घ्या ही आंतरपिके होईल मोठा फायदा

काही फळबागा २ ते ३ वर्षे टिकणाऱ्या असतात. यामध्ये केळी, पपई, अननस यांचा समावेश होतो. यांचे लागवड अंतर कमी असते. यामध्ये पहिल्या वर्षी काही हंगामी भाजीपाला पिकांचे आंतरपीक फायदेशीर ठरते. संत्री, मोसंबी, डाळिंब, पेरू, अंजीर या फळबागा दहा वर्षांपेक्षा अधिक टिकतात. त्यांचे उत्पादन २५-३० वर्षांपर्यंत मिळत राहते. अशा बागांतून आंतरपिके घेण्यामुळे अधिक फायदा होतो. द्राक्ष, चिकू, नारळ, सीताफळ, काजू या फळबागांमध्ये आंतरपिके घेताना अधिक विचार करावा लागतो.

आंतरपिके घेण्याचे फायदे : मुख्य फळबागेचे उत्पादन सुरू होईपर्यंतच्या काळात आंतरपिकांपासून आर्थिक कमाई करता येते. आपल्याकडील उपलब्ध साधन सामग्रीचा आणि मनुष्यबळाचा पुरेपूर वापर करता येतो. उपलब्ध जमीन आणि पाणी यांचा पुरेपूर मोबदला घेता येतो. आंतरपिकाच्या लागवडीमुळे जमिनीत सुधारणा घडवून आणता येते. आंतरपिकाचा लाभ मुख्य फळपिकांसाठीही करून घेता येतो.

आंतरपिके निवडताना घ्यावयाची काळजी : आंतरपीक हंगामी आणि कमी कालावधीत तयार होणारे असावे. त्याची वाढ आणि विस्तार मुख्य फळपिकांना झाकून टाकणारा अगर अडथळा आणणारा नसावा. आंतरपिकांमुळे मुख्य पिकावर कीड-रोग यांचा प्रादुर्भाव होणारा नाही अशी त्याची निवड असावी. फळबागेची जमीन सुधारेल असे आंतरपीक असावे.



डाळिंबातील आंतरपीक : डाळिंबाची लागवड १५ बाय १० फुटांवर असल्यास त्यामध्ये १५ बाय ६ फूट अंतरावर पपईची लागवड करता येते. म्हणजेच डाळिंबाच्या दोन ओळींमध्ये पपईची एक ओळ लावता येते. पपई लागवडीनंतर साधारणतः ९ महिन्यांनंतर उत्पादन मिळण्यास सुरवात होते. तैवान ७८६ सारखी पपईची जात असल्यास प्रत्येक झाडाला सरासरी ४० ते ४५ फळे लागतात. म्हणजेच प्रति झाडापासून ५० ते ६० किलो वजनाची फळे मिळू शकतात. एकरी १५ ते १६ टन पपई उत्पादन मिळते.

कोबीचे आंतरपीक : डाळिंबामध्ये कोबी, प्लॉवर यांचेदेखील आंतरपीक फायदेशीर ठरू शकते. पावसाळी, रब्बी हंगामामध्ये डाळिंब लागवडीनंतर पहिल्या वर्षी ही आंतरपिके घेऊन एकरी उत्पन्न मिळवता येते. तसेच चवळी किंवा श्रावणी घेवडा या द्विदलवर्गीय भाजीपाला पिकांचे उत्पादन जमिनीची सुपिकता वाढवण्यास मदत करते.

केळीमध्ये फुलकोबीचे आंतरपीक : ८ बाय ५ फूट अंतरावर लागवड केलेल्या केळीच्या दोन ओळींमध्ये फुलकोबीचे (प्लॉवर) आंतरपीक घेता येते. प्लॉवरचे एकरी १० टनांपर्यंत उत्पादन मिळू शकते. त्यातील उत्पन्नातून केळी पिकातील खर्च कमी होऊ शकतो.

काकडीमध्ये मिरचीचे आंतरपीक : फेब्रुवारी महिन्यात चार फुटांचे बेड तयार करून त्यावर दीड फूट अंतरावर काकडीच्या बियांची टोकण करावी. त्यानंतर तीन आठवड्यांनी मिरचीची रोपे दीड फुटांवर लावावीत. काकडीचे एकरी १० टनांपर्यंत उत्पादन मिळू शकते. एका पिकातील उत्पन्नातून दुसऱ्या पिकातील खर्च कमी होऊ शकतो.

केळी पिकात खरबूज : केळीच्या दोन ओळींमध्ये खरबुजाची लागवड करता येते. खरबुजाचे एकरी १० ते १२ टन उत्पादन मिळू शकते. खरबुजातील उत्पन्नातून केळीतील खर्च कमी होतो.

तोंडलीत मिरची : तोंडली बाग लावल्यानंतर पहिल्या दोन वर्षांपर्यंत त्यामध्ये उन्हाळ्यात ढोबळी मिरची किंवा साध्या (तिखट) मिरचीचे यशस्वी उत्पादन अनेक शेतकरी घेत आहेत. उन्हाळ्यामध्ये कडक सूर्यप्रकाश व जास्त तापमान असते. मात्र तोंडलीचा वेल मंडपावर चढवला असल्याने मंडपाखाली अर्धसावली मिळते. त्यामध्ये मिरचीचे पीक चांगल्या प्रकारे येते. फूलगळीची समस्या कमी होते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९०५ : नॉर्वेच्या जनतेने सार्वमतात प्रजासत्ताक होण्याऐवजी राजसत्ताच कायम ठेवण्याचा कौल दिला.
१९१८ : ऑस्ट्रिया प्रजासत्ताक बनले.
१९२५ : अमेरिका व इटली या दोन देशांनी आजच्याच दिवशी शांतता करारावर स्वाक्षरी केली होती.
१९२७ : सोविएत कम्युनिस्ट पक्षातुन लिऑन ट्रॉटस्कीची हकालपट्टी करण्यात आल्यामुळे जोसेफ स्टॅलिनच्या हातात सर्व सत्ता गेली.
१९३० : पहिल्या गोलमेज परिषदेची सुरूवात झाली.
१९३६ : केरळ येथील मंदिरे सर्व हिंदू धर्मियांकारिता खुले करण्यात आले होते.
१९४५ : पुण्यात महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू व सरदार वल्लभभाई पटेल यांची राजकीय परिस्थितीवर साडेदहा तास चर्चा झाली.
१९५६ : आजच्याच दिवशी मोरक्को, सुदान आणि ट्युनिशिया हे देश संयुक्त राष्ट्र या जागतिक संघटनेत समाविष्ट झाले होते.
१९५६ : मोरोक्को, सुदान आणि ट्युनिशियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९६७ : आजच्याच दिवशी इंदिरा गांधी यांना पंतप्रधान असतांना पक्षातून बडतर्फ करण्यात आले होते.
१९९० : टिम बर्नर्स-ली यांनी वर्ल्ड वाइड वेबसाठी औपचारिक प्रस्ताव प्रकाशित केला.
१९९८ : परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांना व्हिसाशिवाय मायदेशी येण्याची सुविधा देणारी ‘पर्सन्स ऑफ इंडियन ओरिजीन’ ओळखपत्र योजना कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी जाहीर केले. १५ सप्टेंबर २००२ पासून या योजनेच्या अंमलबजावणीस प्रत्यक्ष सुरुवात झाली.
२००० : १२ नोव्हेंबर हा दिवस ’राष्ट्रीय सार्वजनिक प्रसारण दिन’ म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. १९४७ मधे याच दिवशी महात्मा गांधी यांचे दिल्ली आकाशवाणीवरुन भाषण प्रसारित झाले होते.
२००० : भारताची वूमन ग्रँडमास्टर विजयालक्ष्मी सुब्रम्हण्यम हिने तुर्कस्तानातील इस्तंबूल येथे झालेल्या ३४ व्या बुद्धीबळ ऑलिम्पियाडमधे वैयक्तिक रौप्यपदक मिळवले.
२००३ : ’शांघाय ट्रान्सरॅपिड’ या प्रवासी रेल्वेने ५०१ किमी/तास या वेगाने जाण्याचा विश्वविक्रम प्रस्थापित केला.
२०१५ : आजच्याच दिवशी लेबेनॉन या देशांत आतंकवादी हल्ल्यात ४३ जन मृत्यमुखी पडले होते ह्या हल्ल्याची जबाबदारी आई एस आई संघटनेने स्वीकारली होती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१७ : बहाउल्ला - बहाई पंथाचे संस्थापक (मृत्यू: २९ मे १८९२ आक्रा, इस्त्राएल)
१८६६ : चीन प्रजासत्ताक चे पहिले अध्यक्ष सन यट-सेन यांचा जन्म. (मृत्यू: १९२५)
१८८० : पांडुरंग महादेव तथा ’सेनापती’ बापट सशस्त्र क्रांतिकारक, तत्त्वचिंतक व लढाऊ समाजसेवक (मृत्यू: २८ नोव्हेंबर १९६७)
१८८९ : रीडर डायजेस्टचे सहसंथापक डेव्हिट वॅलेस यांचा जन्म. (मृत्यू: १९८१)
१८९६ : डॉ. सलीम अली - जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ञ, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे एक संस्थापक (मृत्यू: २७ जुलै १९८७)
१९०४ : श्रीधर महादेव तथा एस. एम. जोशी - समाजवादी, कामगार नेते, पत्रकार, संयूक्त महाराष्ट्र चळवळीचे अध्वर्यू (मृत्यू: १ एप्रिल १९८९)
१९४० : अमजद खान - हिन्दी चित्रपटसृष्टीतील नावाजलेले खलनायक (मृत्यू: २७ जुलै १९९२ मुंबई).

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९४६ : पण्डित मदन मोहन मालवीय बनारस हिन्दू विश्वविद्यालयाचे एक संस्थापक (जन्म: २५ डिसेंबर १८६१)
१९५९ : केशवराव मारुतराव जेधे - स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एक प्रमुख नेते, शेतकरी कामगार पक्षाचे एक संस्थापक. केशवराव व बाबूराव याबंधूंचा सत्यशोधक चळवळीकडे ओढा होता. त्यांनी ’मजूर’ हे वृत्तपत्र काढले. (जन्म: ९ मे १८८६)
१९५९ : सेवानंद गजानन नारायण तथा बाळूकाका कानिटकर - अनाथ विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक (जन्म: १८ ऑगस्ट १८८६)
१९६९ : इस्कंदर मिर्झा - पाकिस्तानचे पहिले राष्ट्रपती (जन्म: १३ नोव्हेंबर १८९८)
१९९७ : वेदाचार्य विनायकभट्ट घैसास गुरुजी - वेदाध्ययन आणि त्याचा प्रसार यासाठी संपूर्ण आयुष्य वाहिलेले आचारनिष्ठ घनपाठी.
२००५ : प्रा. मधू दंडवते - रेल्वे मंत्री, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य, अर्थतज्ञ (जन्म: २१ जानेवारी १९२४)
२००७ : भारतीय क्रिकेटर के. सी. इब्राहिम यांचे निधन. (जन्म: २६ जानेवारी १९१९)
२०१४ : भारतीय दिग्दर्शक आणि निर्माते रवी चोप्रा यांचे निधन. (जन्म: २७ सप्टेंबर १९४६).

बुधवार दि.१२ नोव्हेंबर २०२५ ५

राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत

# जालना येथे होणार उपमुख्यमंत्री शिंदे यांची सभा

## सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे- आ. खोतकर

जालना । प्रतिनिधी

येत्या १२ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता, राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच शिवसेना मुख्यनेते ना. एकनाथराव शिंदे यांच्या उपस्थितीत मामा चौक, जालना येथे कार्यकर्ते मेळावा व भव्य जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेला मोठ्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केले आहे. सभेच्या पूर्वतयारीसंदर्भात भाग्यनगर येथील शिवसेना संपर्क कार्यालयात जिल्ह्यातील शिवसेना, युवासेना व संलग्न संघटनांच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मार्गदर्शन करताना आमदार खोतकर म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहे. जालना जिल्ह्यात सुरू असलेल्या व आगामी




विकासकामांची माहिती या सभेत दिली जाणार आहे. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन होणार आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने या सभेला उपस्थित राहावे.

बैठकीत घनसावंगीचे आमदार हिकमतदादा उढाण यांनी शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, एकनाथ शिंदे यांची सभा ही पक्षासाठी ऊर्जा देणारी ठरेल. आगामी निवडणुकांमध्ये शिवसेनेला प्रचंड यश मिळवून देण्यासाठी सर्वांनी संघटित प्रयत्न करावेत. या बैठकीस आमदार हिकमतदादा उढाण,युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर,जिल्हा संपर्कनेते पंडितराव भुतेकर,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, ए.जे. पाटील बोराडे, संपर्कप्रमुख सुनील किनगावकर, लाला तांबोळी, महिला आघाडी जिल्हाप्रमुख कालींदाताई ढगे, सविता केंवडे, शहरप्रमुख विष्णू पाचफुले, ॲड. भास्कर मगरे,जावेदभाई, भाऊसाहेब पाऊलबुदे, गणेशराव राऊत, भगवान अंभोरे आदींसह उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, विभागप्रमुख, आजी-माजी सदस्य, नगरसेवक व मोठ्या संख्येने शिवसैनिक कार्यकर्ते उपस्थित होते. सभेच्या यशासाठी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते उत्साहाने तयारी करत असून, मामा चौक परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले आहे. कार्यकर्त्यांमध्ये उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या भेटीबाबत विशेष उत्सुकता दिसून येत आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातून ग्रामविकासाला गती-सीईओ मिन्नू

जालना । प्रतिनिधी



ग्रामीण विकासाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी राज्य शासनाने सुरू केलेले ''मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान'' हे एक अभिनव आणि प्रेरणादायी अभियान असून, जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून गावाच्या प्रगतीत मोलाचे योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी केले आहे. ग्रामविकास विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षमतेला प्रोत्साहन देणे, शासनाच्या विविध योजनांचा लाभ सर्व घटकांपर्यंत पोहोचविणे, लोकसहभाग वाढविणे तसेच आरोग्य, शिक्षण, उपजीविका आणि सामाजिक न्याय या क्षेत्रांत सर्वांगीण प्रगती साधणे हे आहे.

मूल्यांकनाचे मुख्य घटक (१०० गुण) ग्रामपंचायतींचे मूल्यांकन खालील घटकांवर आधारित असेल सुशासनयुक्त प्रशासन ,सक्षम पंचायत,जलसमृद्ध आणि हरित गाव,मनरेगा व इतर योजनांशी अभिसरण,संस्था सक्षमीकरण,उपजीविका व सामाजिक न्याय,लोकसहभाग,नाविन्यपूर्ण उपक्रम आकर्षक बक्षीस योजना. ग्रामपंचायतींसाठी तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्य या चार स्तरांवर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाच्या ग्रामपंचायतीस ५ कोटी रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे. तसेच पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांसाठीही कोटींच्या बक्षिसांची योजना आहे. जिल्ह्यातील १६० ग्रामपंचायतींची निवड स्वच्छता, हरित विकास आणि लोकसहभागावर भर या अभियानांतर्गत जालना जिल्ह्यातील एकूण १६० ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली असून, निवडलेल्या ग्रामपंचायतींमध्ये ग्रामस्वच्छता, प्लास्टिकमुक्त गाव निर्मिती, वृक्षारोपण, महिलांच्या बचतगट व कारागिरांच्या वस्तूंचे प्रदर्शन-विक्री, सौर व एलईडी दिव्यांच्या वापरास प्रोत्साहन, महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिरे आणि पोषण जनजागृती अशा विविध उपक्रमांची अंमलबजावणी केली जात आहे. या उपक्रमांमुळे ग्रामीण भागात सक्रीय लोकसहभागातून स्वच्छता, आरोग्य, हरित गाव विकास घडवून आणण्यास मदत होत आहे.अभियानाच्या अंमलबजावणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., अति. मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) उदयसिंग राजपूत नियोजन करीत आहेत.

# दहशत पसरविणारी ११ जणांच्या टोळीला १ वर्षासाठी हद्दपार



जालना । प्रतिनिधी

आगामी कळता होणारे निवडणुका शांततेत पार पाडण्यासाठी, तसेच निवडणुक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्यासाठी, जालना जिल्हयातील दोन किंवा त्यापेक्षा जास्त टोळीने गुन्हे करणारे इसमांविरुध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच दहशत पसरविणारे इसमांचे कलम ५५ महाराष्ट्र पोलीस कायदा प्रमाणे हद्यपार प्रस्ताव पाठविणे बाबत जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना कळविण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे गोंदी यांनी पोलीस ठाणे हद्दीमध्ये मालाविरुध्दचे व शरिराविरुध्दचे गुन्हे दाखल असलेल्या ११ इसमांचे टोळीचा हद्यपार प्रस्ताव पोलीस अधीक्षक, यांना सादर केला होता. सदर प्रस्तावावर पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल यांनी सुणावणी घेवुन, सदरील टोळी १) किशोर प्रभु खराद वय ३५ वर्ष रा. सिध्देश्वर फाटा ता. अंबड जि. जालना. २) विकास सुरेश खराद वय २६ वर्ष रा.गोंदी ता. अंबड जि. जालना ३) मनोज सुरेश खराद वय २२ वर्ष रा. सिध्देश्वर फाटा ता. अंबड जि. जालना ४) ऋषीकेश विश्वंभर खराद वय २१ वर्ष रा.गोंदी ता. अंबड जि. जालना ५) डिगांबर रघुनाथ शिंदे वय २२ वर्ष रा. गोंदी ता. अंबड जि. जालना ६) आजीनाथ दत्ता शिंदे वय २५ वर्ष रा. गोंदी ता. अंबड जि. जालना ०७) अक्षय राजाभाऊ बाणाईत वय २६ वर्ष रा.गोंदी ता. अंबड जि. जालना ०८) सोपान दिनकर खराद वय २६ वर्ष रा.गोंदी ता. अंबड जि. जालना ०९) राहुल बळीराम खराद वय २६ वर्ष रा.गोंदी ता. अंबड जि. जालना १०) गणेश कैलास मरकड वय २६ वर्ष रा. गोंदी ता. अंबड जि. जालना ११) अवधुत दत्ता मिटकुल यय ३० वर्ष रा.गोंदी ता. अंबड जि. जालना यांचे कलम ५५ महाराष्ट्र पोलीस कायदा प्रमाणे ०१ वर्ष कालावधी करीता जालना जिल्याहतुन हद्यपार आदेश निर्गमीत केले आहे. आगामी निवडणुका शांततेत पार पाडण्यासाठी शरिराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गुन्हे करुन दहशत पसरविण्याचा प्रयत्न करणारे इसमांचे प्रस्ताव पोलीस अधीक्षक कार्यालयात प्राप्त झालेले आहेत. त्यावर सुणावणी चालु असुन लवकरच हद्यपारीचे आदेश निर्गमीत करण्यात येणार आहे. तसेच अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे. सदरची कारवाई श्री. अजय कुमार बंसल पोलीस अधीक्ष, श्री. आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक, श्री. सिध्देश्वर धुमाळ उप विभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. पंकज जाधव पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. जालना, यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी आम्ही सदैव तत्पर -उदयसिंह बोराडे

मंठा । प्रतिनिधी

नाम फाउंडेशन व शिवमुद्रा प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने मोफत बियाणे वाटप करण्यात आले. गंठा तालुक्यातील गेवराई येथे नाम फाउंडेशन व शिवमुद्रा प्रतिष्ठान याच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांसाठी मोफत बियाणे वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम ग्रामीण भागातील शेतकचऱ्यांच्या आर्थिक अडचणी लक्षात घेऊन, त्यांच्या शेती व्यवसायाला चालना देण्याच्या हेतूने आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांना उच्च दर्जाच्या ज्वारी बियाण्यांच्या पाच किलोच्या पिशव्या मोफत वितरित करण्यात आल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शिवमुद्रा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनी भूषविले.



नाम फाउंडेशनच्या सहकार्याने आयोजित या उपक्रमाचे उदघाटन बोराडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित शेतकऱ्याांशी संवाद साधत त्यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली आणि शासनाच्या अनुदान प्रक्रियेमा प्रक्रियेमध्ये येणाऱ्या अडचणींची सविस्तर माहिती घेतली. कार्यक्रमात बोलताना उदयसिंह बोराडे म्हणाले, की 'गेल्या काही वर्षांत शेती हा व्यवसाय अत्यंत कठीण झाला आहे. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी बाजारभावाचा चढउतार या सर्व संकटांच्या काळात शेतकरी खंबीरपणे उभा राहतो. शेतकरी हा आपल्या देशाचा कणा आहे, त्याच्या श्रमावर देश उभा आहे. त्यामुळे शेतक-यांना बळ देणे, त्यांना वेळोवेळी मदतीचा हात देणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून आम्ही प्रत्येक शेतकऱ्याला असा संदेश देऊ इच्छितो की, त्यांची झुंज एकटी नाही. शिवमुद्रा प्रतिष्ठान नेहमी त्यांच्या सोबत आहे. शेतकऱ्याच्या प्रगतीसाठी आम्ही भविष्यातही विविध सामाजिक व कृषी उपक्रम राबविणार आहोत,' असेही बोराडे यांनी स्पष्ट केले. या उपक्रमात परिसरातील शेकडो शेतकऱ्यानी सहभाग घेतला. अनेक शेतकऱ्याऱ्यांनी या उपक्रमाचे स्वागत करत 'अशा प्रकारचे उपक्रम प्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आहेत' असे मत व्यक्त केले. अतिवृष्टीमुळे नुकसानीला सामोरे गेलेल्या शेतकऱ्यांसाठी हा बियाणे वाटप उपक्रम आशेचा किरण ठरला.

# दोन दुचाकींच्या अपघातात डॉक्टरचा मृत्यू

परभणी । प्रतिनिधी

जिंतूर-परभणी रोडवरील टाकळी कुंभकर्ण गावाजवळ सोमवारी सायंकाळी दोन मोटरसायकलींचा समोरासमोर भीषण अपघात झाला. या अपघातात झरी येथील डॉक्टरचा मृत्यू झाला तर टाकळी कुंभकर्ण येथील एकजण गंभीर जखमी झाले आहे.

डॉ.गजानन आत्माराम काळे (वय ६२, रा.झरी, ता. परभणी) असे मयत डॉक्टरचे नाव आहे. तर कृष्णा नागोराव श्रीरामे (वय ४०, रा. टाकळी कुंभकर्ण, ता. परभणी) हे जखमी झाले आहेत. झरी येथील डॉ.काळे हे त्यांच्या दुचाकीवरून प्रवास करीत असताना समोरून येणाऱ्या मोटरसायकलची जोरदार धडक बसली. या धडकेत दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले असून अपघात एवढा भीषण होता की डॉ.काळे यांचा जागीच मृत्यू झाला. दुसरे मोटरसायकलस्वार कृष्णा नागोराव श्रीरामे (रा.टाकळी कुंभकर्ण, ता.परभणी) हे गंभीर जखमी झाले असून त्यांना जिल्हा रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मयत डॉ.काळे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. जिल्हा रुग्णालय येथे त्यांच्या मृतदेहावर शवविच्छेदन करण्यात आले.

# शेती क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आवश्यक -गडकरी

लातूर । प्रतिनिधी

शेतकऱ्यांना योग्य न्याय द्यायचा असेल, तर शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणे अत्यावश्यक आहे. अभिमन्यू पवार यांच्यामध्ये हा प्रयोग यशस्वी करण्याची क्षमता आहे. निळकंठेश्वर कारखाना सुस्थितीत आल्यावर शेतकऱ्यांना योग्य भाव मिळेल आणि या भागाची आर्थिक स्थिती निश्चितच सुचारेल, असा ठाम विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी त्यांनी व्यक्त केला,

औसा तालुक्यातील किल्लारी येथील श्री निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्यांच्या ४२ व्या गळीत हंगामाचा भव्य शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कृषीरत्न बी. बी. ठोंबरे होते. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आ. अभिमन्यू पवार, माजी मंत्री आ. संभाज रााव पाटील निलंगेकर, आ. रमेश कराड, राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, भाजप जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर, माजीआ, गोविंद केंद्रे, अर्चनाताई पाटील चाकूरकर, मा. खासदार सुधाकर शृंगारे, माजी आ. बब्रुवान खंदाडे, गणेश हाके, शिवाजी माने, संताजी चालुक्य, सुरेश बिराजदार, बबन भोसले आदी मान्यवरांची उपस्थिती होती. नितिन गडकरी म्हणाले ऊस उत्पादक शेतकऱ्याने कमीत-कमी पाणी, खत आणिउत्पादन खर्च यातून अधिक उत्पादन मिळवले पाहिजे. शेती हे एक विज्ञान आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्याशिवाय उत्पादनात वाढ होऊ शकत नाही. साखर उद्योग केवळ साखरेपुरता मर्यादित राहू नये; इथेनॉल, इंधन आणि हवाई इंधन निर्मितीकडे कारखानदारांनी लक्ष दिले पाहिजे. शेतकरी ऊर्जा दाता बनल्याशिवाय साखर उद्योगाचे आणि शेतक-यांचे भवितव्य उज्ज्वल होणार नाही, असे ते म्हणाले. सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी गडकरींनी देशभर चांगले रस्ते बांधले, तर अभिमन्यू पवारांनी मतदारसंघातील शेतरस्त्यांद्वारे विकासाचा मार्ग तयार केला आहे, आ. अभिमन्यू पवार यांच्या मागे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आशीर्वाद सदैव आहेत, असे सांगितले. बी.बी. ठोमरे यांनी किल्लारी कारखाना सुरू करणे हे जणू शिवधनुष्य उचलण्यासारखे होते. ते धनुष्य आमदार अभिमन्यू पवार यांनी उचलले. आमचे त्यांना पूर्ण सहकार्य राहील, असे सांगितले.

# शेतकऱ्यांनी ई-केवायसी तात्काळ करणे गरजेचे-तहसीलदार विजय चव्हाण

अंबड । प्रतिनिधी

अनुदान पासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांनी ई- केवायसी तत्काळ करून घेणे असे आव्हान तहसीलदार विजय चव्हाण यांनी केले आहे.१० नोव्हेंबर २०२५

सप्टेंबर २०२५ मधील अतिवृष्टी अनुदान व रब्बी हंगाम विशेष मदत वितरणा करण्याबाबत अंबड तालुक्यात माहे सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या अनुषंगाने, बाधीत शेतकऱ्यांना मदत देण्याची प्रक्रिया सुरू आहे. सप्टेंबर २०२५ मधील अतिवृष्टीनंतर, गावपातळीवर तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांच्या त्रिस्तरीय समितीमार्फत पंचनामे करण्यात आले. त्यानुसार प्राप्त झालेल्या बाधीत शेतकरी व क्षेत्राच्या याद्या अपलोड करण्यात आल्या असून, अनुदान थेट शेतकऱ्यांच्या खात्यात () जमा होत आहे.

नवीन रब्बी हंगाम मदत (शासन निर्णय ४ नोव्हेंबर २०२५ महाराष्ट्र शासनाने निर्णयातून रब्बी करिता व इतर बाबींसाठी विशेष मदत जाहीर केली आहे. याअंतर्गत, बाधीत क्षेत्रांना प्रति हेक्टरी १०,००० रुपये प्रमाणे देय रक्कम




देण्याचे आदेशित आहे. या लाभासाठी देखील याद्या अपलोड होत असून, लवकरच हे अनुदानही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल. अनुदान वितरणाची सद्यस्थिती तालुक्यातील शेतकऱ्यांनी एनडीआरएफ () अनुदान एकूण पात्र खातेदार: २९,६५१ पेमेंट प्रक्रिया सुरू (): २९,६५१ खातेदारांच्या खात्यात पैसे जमा करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. ई-केवायसी (-) प्रलंबित: २५,४१६ खातेदारांची ई-केवायसी प्रलंबित () आहे. ई-केवायसी पूर्ण झाल्याशिवाय त्यांच्या खात्यात पैसे जमा होणार नाहीत. पेमेंट रिजेक्ट (): १८८ खातेदारांचे पेमेंट विविध कारणांमुळे (उदा. आधार-बँक लिंक नसणे, आधार तपशील न जुळणे) रिजेक्ट झाले आहे. २. रब्बी हंगाम विशेष मदत: अपलोड केलेले खातेदार: २९,६५५ उर्वरित पात्र खातेदारांच्या याद्या तात्काळ अपलोड करण्याचे काम सुरू आहे. एसडीआरएफ () अनुदान: अनुदान जमा झालेले: १,७९३ शेतकरी ई-केवायसी प्रलंबित: १,८९२ शेतकऱ्यांची ई-केवायसी प्रलंबित आहे. शेतकऱ्यांनी . कार्यालयात येऊ नये: अनुदान प्रक्रियेसाठी कोणत्याही शेतकऱ्याने तहसील कार्यालयात किंवा इतर कोणत्याही शासकीय कार्यालयात येण्याची गरज नाही. . तलाठी यांच्याशी संपर्क साधा: बाधित शेतकऱ्यांच्या सर्व याद्या (अनुदान प्राप्त, ई-केवायसी प्रलंबित, रिजेक्टेड) संबंधित भागातील तलाठी यांच्याकडे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. . ई-केवायसी (-) तात्काळ करा: ज्या शेतकऱ्यांची नावे 'ई-केवायसी प्रलंबित' यादीत आहेत (विशेषतः चे २५,४१६ आणि चे १,८९२ शेतकरी), त्यांनी तात्काळ आपली ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी. ई-केवायसी पूर्ण होताच, प्रलंबित अनुदान त्यांच्या खात्यात आपोआप () जमा होईल. पेमेंट रिजेक्ट () बाबत सूचना: ज्या १८८ शेतकऱ्यांचे पेमेंट रिजेक्ट झाले आहे, त्यांनी आपले आधार कार्ड दुरुस्त करून घ्यावे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आपले आधार कार्ड बँक खात्याशी लिंक (- ) केलेले असल्याची खात्री करावी. ही प्रक्रिया पूर्ण करून तलाठी यांना सूचित करावे, जेणेकरून त्यांचे अनुदान पुन्हा पाठवता येईल. माहिती न दिलेले शेतकरी ज्या शेतकऱ्यांनी अद्याप आपली माहिती पंचनाम्यासाठी किंवा मदतीसाठी दिलेली नाही, त्यांनी तात्काळ आपल्या तलाठी यांच्याशी संपर्क साधून माहिती जमा करावी. शेतकऱ्यांपर्यंत योग्य आणि अधिकृत माहिती पोहोचणे अत्यंत गरजेचे आहे. ई-केवायसी अभावी मोठा निधी प्रलंबित राहिला आहे. शेतकऱ्यांनी ई-केवायसी करावे. तसेच, एकही पात्र शेतकरी अनुदानापासून वंचित राहणार नाही. असे तहसीलदार विजय चव्हाण यांनी प्रसिद्धी माध्यमातून सांगितले.

# काँग्रेसच्या उमेदवार मुलाखतीला उत्स्फूर्त प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

काँग्रेसकडून नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींना शहागंज येथील गांधी भवनात रविवारी प्रारंभ झाला. जिल्ह्यातील फुलंब्री, सिल्लोड, पैठण, वैजापूर, कन्नड, गंगापूर आणि खुलताबाद येथील इच्छुक उमेदवारांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

जिल्ह्यातील नगरपरिषद नगरपंचायत निवडणुकीसाठी काँग्रेसकडून गांधी भवनात इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. यावेळी खा. डॉ. कल्याण काळे, जिल्हा प्रभारी व प्रदेश उपाध्यक्ष तुकाराम रेंगे, प्रदेश उपाध्यक्ष अनिल पटेल, जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर, शहराध्यक्ष शेख युसूफ यांच्यासह जिल्हा व प्रदेश पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. त्यांनी इच्छुकांना मार्गदर्शन करत जास्तीत जास्त नगरसेवक व नगराध्यक्ष निवडून आणण्याचे आवाहान केले. फुलंब्री नगरपंचायतीच्या १७ प्रभागांसाठी सुमारे ३० उमेदवार, सिल्लोड नगरपरिषदेसाठी २८ उमेदवार, पैठणसाठी ५९ उमेदवार, वैजापूरसाठी ४०, कन्नडसाठी ४५,




गंगापूरसाठी ६० आणि खुलताबादसाठी ५० उमेदवार उपस्थित होते. सर्व मुलाखती शिस्तबद्ध वातावरणात पार पडल्या असून, कुठेही शक्तिप्रदर्शनाला परवानगी देण्यात आली नव्हती. या बैठकीदरम्यान अनेक स्थानिक पदाधिकाऱ्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. उमेदवार निवड प्रक्रियेत पारदर्शकता राखत तत्त्वनिष्ठ आणि जनाधार असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार असल्याचे प्रदेश पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. या मुलाखतींमुळे आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या रणसंग्रामाची काँग्रेसने दमदार सुरुवात केल्याचे चित्र जिल्हाभर उमटले आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

बुधवार दि.१२ नोव्हेंबर २०२५ | ६

# धारूर नगर परिषदेमध्ये होणार चौरंगी लढत

धारूर। चंद्रकांत देशपांडे

**धारूर नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये चौरंगी लढत होण्याची शक्यता दिसत असून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, भारतीय जनता पार्टी आणि एक अपक्ष अशी चौरंगी होण्याची शक्यता दिसत आहे.**

धारूर नगरपालिकेसाठी अनेकांनी कंबर कसली असून नगरपालिकेमध्ये अनेक जण नगरसेवक पदासाठी इच्छुक आहेत. नगराध्यक्ष पदासाठी मात्र या ठिकाणी चौरंगी लढत होण्याची दाट शक्यता दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातर्फे अर्जुनराव गायकवाड यांची उमेदवारी निश्चित समजली जात आहे.याच वेळी अपक्ष उमेदवार सुरेश गवळी हे ही निश्चित रिंगणात उतरणार आहेत. भाजपाचे उमेदवार अद्याप जाहीर झाले नसले तरी माजी नगराध्यक्ष डॉ. स्वरूपसिंह हजारी यांच्या नेतृत्वाखालीच ही निवडणूक होईल. अजित पवार गटामध्ये अनेक जण इच्छुक आहेत. त्यामुळे आ. प्रकाश सोळंके यांच्यासमोर तिकीट नेमके कोणाला द्यायचे हा प्रश्न निर्माण झाला आहे. एकाला तिकीट दिले तर दुसरा नाराज आणि दुसऱ्याला दिले तर





तिसरा नाराज अशा परिस्थितीमध्ये आ. सोळंके यांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. आ. प्रकाश सोळंके यांनी निवडणुकीच्या तोंडावर अनेक विकास योजना आणल्या.धारूरला अनेक वर्षापासून पाणी प्रश्न सोडवण्यात आ. सोळंके यांना यश आले आहे. धारूरच्या रस्त्याची कामेही दर्जेदार होत आहेत. शहराला पाणीपुरवठा व्हावा आणि शहरातील रस्ते चांगले असावेत ही सर्वसामान्य माणसाची अपेक्षा असते. या दोन्हीही अपेक्षा आ. प्रकाश सोळुंके यांनी जातीने लक्ष घालून पूर्ण केले आहेत. आ.प्रकाश सोळंके यांचा उमेदवार लवकर निश्चित झाला तर निवडणूक सोपी जाण्याची शक्यता आहे. नगराध्यक्ष डॉ. स्वरूपसिंह हजारी यांना पाणी प्रश्न सोडवण्यात अपयश आले. आणि गाव स्वच्छ राखण्यातही ते अपयशी ठरले. ज्या व्यक्तीने पहिल्या पाच वर्षांमध्ये स्वच्छता अभियानाचे पारितोषिक पटकावले त्या व्यक्तीला शहरात स्वच्छता राखण्यात अपयश का यावे? अशी चर्चा लोक करत आहेत. याशिवाय त्यांच्याबद्दल अनेक गोष्टींच्या वेगवेगळ्या चर्चा सध्या सुरू आहेत. आज घडीला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अर्जुनराव गायकवाड आणि जनतेत सतत राहून त्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणारे सुरेशराव गवळी यांनी सध्यातरी प्रचाराचा आघाडी

▶▶ पान २ वर

## अंबाजोगाई, परळीत शिवसेना इच्छुकांच्या मुलाखतीला उत्स्फूर्त प्रतिसाद

### विकासाभिमुख उमेदवारांनाच मिळेल संधी–सचिन मुळूक

बीड । प्रतिनिधी

आगामी अंबाजोगाई आणि परळी नगर पालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने उमेदवार निवडीची प्रक्रिया वेगात सुरू केली आहे. शिवसेने मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार, जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि.१०) शिवसेनेच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखतीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आगामी



पालिका निवडणुकीत विकासाभिमुख उमेदवारांनाच शिवसेनेकडून संधी मिळणार असल्याचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले. जिल्ह्यातील सर्वच नगर पालिकांवर भगवा फडकविण्यासाठी शिवसेना कामाला लागली आहे. सोमवारी (दि.१०) अंबाजोगाई येथे ३९, तर परळी येथे तब्बल ५३ इच्छुकांनी नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांसाठी मुलाखती दिल्या. दोन्ही ठिकाणी शिवसैनिकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. आगामी निवडणुकीत भगवा पुन्हा फडकवायचाच या निर्धाराने कार्यकर्त्यांनी हजेरी लावली. शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी स्वत: इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या.

मुलाखतीदरम्यान उमेदवारांना त्यांचा प्रभागनिहाय विकास आराखडा, पक्षनिष्ठा, जनसंपर्क आणि स्थानिक कामकाजाबाबत प्रश्न विचारण्यात आले. पारदर्शक प्रक्रियेद्वारे योग्य उमेदवार निवडण्याचा पक्षाचा प्रयत्न असल्याचे मुळूक यांनी स्पष्ट केले. या प्रसंगी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक म्हणाले की, शिवसेना हा केवळ राजकारण करणारा पक्ष नाही तर जनतेच्या सेवेत असलेली संघटना आहे. नगर पालिका ही लोकजीवनाशी थेट जोडलेली संस्था आहे. त्यामुळे आमचे उमेदवार जनतेशी जवळचे, काम करणारे आणि विकासासाठी कटिबद्ध

▶▶ पान २ वर

## कुंडलिक खांडेंचा पुन्हा शिवसेनेत प्रवेश; स्वत: ठाकरेंनी बांधले शिवबंधन

### पक्षप्रवेशानंतर जिल्ह्यात शिवसेना जोमाने वाढविण्याचे ठाकरेंचे खांडे यांना आदेश, बीडचे राजकिय गणित बदलणार

मुंबई । प्रतिनिधी

पंचविस वर्षांपुर्वी कुंडलिक खांडे यांनी शिवसेनेतून राजकारणाला सुरूवात केली. मध्यल्या काळात ते शिवसेनेपासून दूर होते. परंतु पुन्हा त्यांनी शिवसेना पक्षप्रमूख उध्दव ठाकरे यांच्या उपस्थितीत दि.११ नोव्हेंबर रोजी मुंबईत मातोश्रीवर जावून शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी उध्दव ठाकरे यांनी त्यांच्या हाती शिवबंधन बांधून बीड जिल्ह्यात शिवसेना वाढविण्याची जबाबदारीही सोपविली. दरम्यान, कुंडलिक खांडे यांच्या प्रवेशाने जिल्ह्यातील राजकारण बदलणार आहे.



यावेळी विरोधी पक्ष नेते आ.अंबादास दानवे, सुभाष देसाई, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांची प्रमुख उपस्थिती होती. कुंडलिक खांडे यांच्या शिवसेना प्रवेशाने बीड जिल्ह्यातील राजकारणाचे गणित बदलणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या घोषणेनंतर राज्यभरात आता मोठ्या घडामोडी घडत आहेत. याच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात राजकीय घडामोडींना चांगलाच वेग आला आहे. सरपंच-उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह मंगळवार दि.११ नोव्हेंबर रोजी मुंबई येथील मातोश्री बंगल्यावर शिवसेनेत प्रवेश केला. खांडे यांच्या शिवसेना

▶▶ पान २ वर

## झेडपीत अतिरिक्त कामकाजच्या गोंडस नावाखाली प्रतिनियुक्त्या

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण, बांधकाम आणि आरोग्य विभागांमध्ये विभागप्रमुखांचा मनमानी कारभार सुरू असून, विभागीय आयुक्तांची परवानगी न घेता प्रतिनियुक्तीऐवजी अतिरिक्त कामकाज या गोंडस शब्दाखाली आपल्या मर्जीतील कर्मचाऱ्यांना पुन्हा त्याच विभागात ठेवण्यात येत असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य, डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे.

या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री अजितदादा पवार यांना जिल्हाधिकारी बीड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत लेखी तक्रार सादर करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या कोणत्याही कर्मचाऱ्याची प्रतिनियुक्ती करण्यासाठी विभागीय आयुक्तांची परवानगी आवश्यक असते. मात्र, प्रतिनियुक्ती हा शब्द न वापरता 'अतिरिक्त कामकाज' या नावाखाली मोठ्या प्रमाणात प्रतिनियुक्त्या करून नियमांचा बेकायदेशीर पद्धतीने भंग केला जात आहे. काही विभागप्रमुख आपल्या आवडत्या कर्मचाऱ्यांना

▶▶ पान २ वर

## कॅन्सर जनजागृतीसाठी रोटरीने काढला लॉगमार्च

### सामाजिक संस्थांसह महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग

अंबाजोगाई । प्रतिनिधी

समाजात कॅन्सर या रोगाविषयी जागरूकता निर्माण होण्यासाठी उपचारानंतर हा आजार पुर्णतः बरा होतो. हा संदेश देत रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीने कॅन्सर जनजागृतीसाठी शहरात लॉगमार्च काढून आरोग्य जनजागृतीचा संदेश दिला.

रोटरी क्लबच्या वतीने रोटरी रन कॅन्सर जनजागृती हा उपक्रम राबविण्यात आला. कॅन्सर या आजाराची जनजागृती करण्यासाठी शहरातील




डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते पोलिस स्टेशन या अंतरात शहरवासीयांचा लॉगमार्च काढण्यात आला. या लॉगमार्चचे उद्घाटन लातूर येथील प्रसिद्ध कॅन्सर रोग तज्ञ डॉ.अजय पुनपाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी पोलिस निरिक्षक शरद जोगदंड, रोटरी क्लबच्या अध्यक्षा रोहिणी पाठक, उपाध्यक्ष धनराज सोळंकी, सहसचिव राधेशाम लोहिया, डॉ.नवनाथ घुगे, संतोष मोहिते, कल्याण काळे विजयसिंह ठाकुर, हर्षवन वडमारे, राजेंद्र घोडके, भारतीय जैन संघटनेचे आदेश कर्नावट यांच्या उपस्थितीत या लॉगमार्चचा प्रारंभ झाला. कॅन्सर जनजागृतीचे विविध फलक हातात घेतलेल्या विद्यार्थ्यांनी शहरातून ही रॅली काढली. रॅलीचा

▶▶ पान २ वर

## सीड्स बॉल: कृषी क्षेत्रात वरदान ठरणार–जयंत रानडे



बीड । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व स्वा.सावरकर महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. ८ नोव्हेंबर २०२५ रोजी एक दिवसीय पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण उपक्रम पूर्ण झाला. या पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण उपक्रमास उद्घाटक म्हणून जयंत रानडे स्थापत्य अभियंता सांगली यांच्या हस्ते झाले तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाईचे

▶▶ पान २ वर

## कॅशलेस पॉलिसी असून ग्राहकाकडून रक्कम वसूल; चोला मंडलम विमा कंपनीला दणका

### बीड जिल्हा ग्राहक आयोगाकडून कारवाई; ॲड.नारायण सिरसट यांनी मांडली बाजू



बीड । प्रतिनिधी

कॅशलेस मोटार विमा पॉलिसी असतानाही दुरुस्तीच्या बिलासाठी ग्राहकाकडून ६५ हजार रुपये वसूल करणाऱ्या चोला मंडलम जनरल इन्शुरन्स कंपनीला बीड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने दणका दिला आहे. तक्रारदारास रक्कम परत करून व्याजासह भरपाई देण्याचा आयोगाने आदेश दि.२९ जुलै २०२५ रोजी दिला आहे. या निर्णयामुळे कॅशलेस पॉलिसी असूनही ग्राहकांकडून वसुली करणाऱ्या कंपन्यांना चाप बसणार आहे. याप्रकरणात तक्रारदाराची बाजू ड.नारायण सिरसट यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी मांडली आहे.

श्रीकांत सोमनाथ मोराळे (रा. बीड) असे तक्राराचे नाव आहे. त्यांनी ह्युंदाई क्रेएटा (एमएच-२३-एएस-९३३८) या त्यांच्या वाहनासाठी चोला मंडलम जनरल इन्शुरन्स कंपनीकडून मोटार विमा पॉलिसी घेतली होती, जी २६ ऑगस्ट २०२१ ते २५ ऑगस्ट २०२२ या कालावधीसाठी लागू होती. या पॉलिसीत कॅशलेस क्लेम सुविधा स्पष्टपणे नमूद होती. दरम्यान, १ नोव्हेंबर २०२१ रोजी तक्रारदाराचे वाहन अपघातग्रस्त झाले.

▶▶ पान २ वर

## ..तर नगररोडचे काम बंद पाडू–सुर्वे

बीड । प्रतिनिधी

**शहरातील महत्वाचा असणारा धानोरा रोड या रस्त्यासाठी राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री यांच्या आदेशावरून वरुण जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. अजित पवार यांनी जिल्हा नियोजन मधून अर्धवट ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्याचे कार्यारंभ आदेश झाले व संबंधित रस्ता हा जेथे अवशक्त आहे तिथे न करता दुसरीकडेच चालू केला आहे.**



या संदर्भात संबंधित कंत्राटदारास भाजपा युवा नेते संभाजी सुर्वे यांनी विचारपूस केली असता त्यांनी ज्या जागी रस्ता गरजेचा आहे तेथे वाद चालू आहेत त्या ठिकाणी मी रस्ता करू शकत नाही असे उत्तर दिले. त्या वेळी सुर्वे यांनी नगर परिषद सीओ असलेले फडसे यांना फोन वरून संवाद साधला असता त्यांनी सांगितले की असा जर काही प्रकार असेल तर उद्या पासून सदरील

▶▶ पान २ वर

# फार्मर आयडी असूनही नुकसानभरपाई मिळाली नाही?

### शेतकऱ्यांनो तातडीने दुरुस्ती करून घ्या–तहसीलदार शेळके

बीड । प्रतिनिधी

राज्यातील अनेक शेतकऱ्यांनी शासनाच्या सूचनेनुसार आपली फार्मर आयडी तयार केला असला तरी, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई त्यांच्या खात्यात जमा झालेली नाही, अशी बाब समोर आली आहे. बीड जिल्ह्यातही ही समस्या मोठ्या प्रमाणावर आढळत आहे. नुकसानभरपाईचा निधी शासनाने मंजूर केला असला, तरी फार्मर आयडीमधील तांत्रिक चुका, आधार आणि बँक लिंकिंगमधील विसंगती यामुळे रक्कम अडकली आहे.

जिल्हा प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांचे बँक खाते आधारशी लिंक नसणे, नावात स्पेलिंगची चूक असणे किंवा एकाच शेतकऱ्याच्या नावावर दोन वेगवेगळ्या फार्मर आयडी तयार झालेल्या असणे या कारणांमुळे नुकसानभरपाईची रक्कम अडकली आहे. काही प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांचे खाते निष्क्रिय असल्याने व्यवहार पूर्ण होऊ शकले नाहीत .जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि उपविभागीय



अधिकारी कविता जाधव यांनी संयुक्त आवाहन करून सांगितले की, शेतकऱ्यांनी आपल्या फार्मर आयडीमधील नाव, आधार क्रमांक, बँक खाते माहिती तपासून त्वरित दुरुस्ती करावी. शासनाकडून मदत मंजूर असून, तांत्रिक चुका राहिल्यास निधी खात्यात जमा होणार नाही. या संदर्भात प्रशासनाने सर्व तालुका स्तरावर कृषी व महसूल अधिकाऱ्यांना 'तपासणी आणि सुधारणा मोहिम' राबविण्याचे निर्देश दिले आहेत. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी माहिती देताना सांगितले की, बीड तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांसाठी विशेष शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. प्रत्येक मंडळ विभागात 'फार्मर आयडी तपासणी केंद्र' सुरू करण्यात आले असून, महा ई-सेवा केंद्रांद्वारे दुरुस्तीची सुविधा उपलब्ध आहे. शेतकऱ्यांनी आधार लिंक, खाते नाव आणि आयडी क्रमांक अचूक तपासणे अत्यंत आवश्यक आहे. तहसीलदार शेळके यांनी पुढे सांगितले की, महा ई-सेवा केंद्रातील ऑपरेटर, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांच्या मदतीने ही प्रक्रिया सोपी पद्धतीने पूर्ण केली जाऊ शकते. फार्मर आयडी योग्य नसल्यास नुकसानभरपाई रोखली जाते; त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने ही जबाबदारी स्वतः घेऊन सुधारणा करणे अत्यावश्यक आहे

▶▶ पान २ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# पुण्यासाठी १००० ई-बस मंजूर

## वाहतूक कोंडी कमी होण्यासोबतच प्रदूषणावरही नियंत्रण येणार-मुरलीधर मोहोळ



**पुणे । प्रतिनिधी**

**नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने पीएम-ई ड्राईव्ह योजनेंतर्गत पुणे शहरासाठी एक हजार 'ई-बस' खरेदी करण्यास मान्यता दिली आहे. केंद्रीय अवजड उद्योग मंत्री एच.डी. कुमारस्वामी यांनी अंतिम शिक्कामोर्तब केले आहे. त्यामुळे लवकरच पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) ताफ्यात या बस समाविष्ट होतील. परिणामी, पुण्याची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक भक्कम होऊन, कोंडी कमी होईल तसेच प्रदूषण नियंत्रणासाठीही मदत होईल, अशी माहिती केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.**

पुणे आणि पिंपरी चिंचवडच्या हद्दीसह 'पीएमआरडी'च्या हद्दीत सेवा देणारी पीएमपी ही प्रमुख सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आहे. पीएमपीकडे सध्या २००० बस आहेत. त्यातील सुमारे ७५० स्वमालकीचा तर उर्वरित ठेकेदारांच्या आहेत. पुणे, पिंपरी चिंचवडचा वाढता विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता पीएमपीच्या ताफ्यात किमान तीन हजार बस असणे आवश्यक आहे. म्हणून पीएमपीएमएलच्या ताफ्यात नव्या बस दाखल करण्यासाठी केंद्रीय मंत्री मोहोळ यांनी राज्य सरकारसह केंद्राकडे सातत्याने पाठपुरावा सुरु ठेवला होता. यासाठी मोहोळ यांनी एच.डी. कुमारस्वामी यांच्या वेळोवेळी प्रयत्न भेटी घेऊन पाठपुरावा केला होता, ज्याला आता यश आले आहे. या प्रक्रियेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही साथ महत्त्वाची ठरली. या बसेससाठी निधी उपलब्ध व्हावा, यासाठी आवश्यक असलेले पत्र राज्य शासनाकडून रिझर्व्ह बँकेला पाठवले जावे, यासाठी मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर तातडीने तसा प्रस्ताव राज्य शासनाकडून रिझर्व्ह बँकेला पाठविण्यात आला. त्यानंतर या १००० 'ई-बस' साठीचा प्रस्ताव पीएमपीएमलमार्फत केंद्रीय अवजड उद्योग मंत्रालयाकडे पाठविण्यात आला. त्याला गती मिळावी, यासाठी पंधरा दिवसांपूर्वीच मी एच. डी. कुमारस्वामी यांची नवी दिल्लीत भेट घेत सविस्तर चर्चा केली होती. त्यांनीही तातडीने या प्रस्तावाला गती देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार मंगळवारी झालेल्या केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. त्यामुळे पीएमपीला १००० ई बस मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, असे मोहोळ म्हणाले. पुणे शहराची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था भक्कम करण्यावर आमचा भर आहे. सध्या शहरात ३२ किलोमीटर मार्गावर मेट्रो धावते आहे. शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रोही लवकरच धावू लागेल. याशिवाय मेट्रोच्या विस्तारित मार्गांनाही मान्यता मिळाली आहे. त्याचजोडीला पीएमपीएमएलचे सक्षमीकरण करणे हा माझा प्रमुख अजेंडा आहे. पीएमपीच्या ताफ्यात अधिकाधिक बस याव्यात, यादृष्टीने मी सातत्याने प्रयत्नशील होतो. या पाठपुराव्याला यश मिळाले असून लवकरात लवकर या बस पीएमपीच्या ताफ्यात याव्यात, याला माझे प्राधान्य राहील,'असे मुरलीधर मोहोळ यांनी स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने कायमच शहरांच्या सर्वांगीण, सुनियोजित आणि शाश्वत विकासावर भर दिला आहे. त्यात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा विस्ताराला प्राधान्य दिले गेले आहे. त्यानुसार पुणे-पिंपरी चिंचवड शहरासाठी एक हजार नव्या 'ई बस' खरेदीसाठी मान्यता दिल्याबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मी पुणेकरांच्या वतीने आभार मानतो. यासाठी केलेल्या सहकार्याबद्दल केंद्रीय मंत्री एच.डी. कुमारस्वामी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही मी धन्यवाद देतो,' असे मोहोळ यांनी सांगितले.

## बंडू आंदेकरच्या आणखी एका अवैध बांधकामावर हातोडा



**पुणे । प्रतिनिधी**

**कुख्यात बंडू आंदेकर याच्या अवैध बांधकामावर आणखी एक हातोडा बसला आहे. 'वारकरी भवन' या नावाने उभारण्यात आलेल्या इमारतीमध्ये सेवेच्या नावाखाली खंडणी, जुगार अड्डा आणि इतर गुन्हेगारी कारवायांसाठी त्याचा वापर केला जात होता. त्यामुळे हे बेकायदेशीर बांधकाम पाडण्यात आल्याची माहिती पोलिस उपायुक्त कृषिकेश रावळे यांनी दिली.**

या ठिकाणी धार्मिक सेवाभावाचा आडोसा घेऊन खंडणी वसुली आणि गुन्हेगारी कारवाया सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर प्रशासनाने तातडीने कारवाई हाती घेतली. तपासात या इमारतीस कोणतीही बांधकाम परवानगी नसल्याचे, तसेच रस्ता अडवून, नियमबाह्य पद्धतीने बांधकाम केल्याचे उघड झाले. पोलिस आणि महापालिका प्रशासनाच्या संयुक्त पथकाने सोमवारी सकाळपासून पाडकामाची मोहीम सुरू केली. अवैध बांधकाम जमीनदोस्त करण्याचे काम सुरू असून, हे पाडकाम मंगळवारीदेखील सुरू राहील, असे पोलिस उपायुक्त रावळे यांनी सांगितले. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी सराईत गुन्हेगारांची आर्थिक कोंडी करण्याचे काम सुरू केले आहे. बंडू आंदेकर, नीलेश घायवळ, गजा मारणे, रिझवान ऊर्फ टिपू पठाण अशा कुख्यात गुंडांच्या मालमत्ता जप्त करण्याची आणि बँक खाती गोठविण्याची कारवाई करण्यात येत आहे. काही दिवसांपूर्वी बंडू आंदेकरची नाना पेठेतील अनधिकृत बांधकामे पाडली होती. तसेच, नीलेश घायवळ याच्या संपत्तीची चौकशी करण्याबाबत 'इडी'ला नुकतेच पत्रही पाठवले आहे.

## रुंदीकरणासाठी ग्रामस्थांचा पुढाकार

### पुसेगावात रखडलेल्या महामार्गासाठी चालवला जेसीबी



**पुसेगाव । प्रतिनिधी**

**सातारा म्हसवड टेंभुर्णी-लातूर या राष्ट्रीय महामार्गावरील पुसेगाव हद्दीतील रखडलेल्या रुंदीकरणाच्या कामाबाबत ग्रामस्थांनी सकारात्मकता दाखवली आहे. स्वत:हून मालकीच्या जागेवर जेसीबी चालवून रस्ता रुंदीकरणासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घेतला. सकाळी ११ वाजता मारुती मंदिरासमोर सर्वपक्षीय पुढाऱ्यांनी व गावातील विविध तरुण मंडळांनी रास्ता रोको आंदोलनाचा एल्गार पुकारल्याने सुमारे दोन तास पुसेगावातील वाहतूक ठप्प झाली होती.**

या आंदोलनादरम्यान पुसेगावात रखडलेल्या रस्त्याच्या कामाला ग्रामस्थांची साथ मिळाली. स्वत:हून मालकीच्या जागेवर जेसीबी चालवून रस्ता रुंदीकरणासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घेतला. श्री सेवागिरी महाराजांच्या यात्रेपूर्वी १० डिसेंबरपर्यंत रस्त्याचे काम पूर्ण करून देण्याचे आश्वासन प्रशासन आणि संबंधित कंपनीने दिले आहे. खटाव तालुक्याची मुख्य बाजारपेठ असलेल्या पुसेगावातून गेलेल्या सातारा-लातूर या राष्ट्रीय महामार्गावर गेल्या चार वर्षांपासून सातत्याने वाहतुकीची कोंडी होत आहे. दिवाळीतील आठ दिवस आणि सध्याच्या वाहतूक कोंडीने नागरिक आणि प्रवासी कमालीचे हैराण झाले आहेत. या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करावे, या मागणीसाठी शिवसेनेचे प्रताप जाधव, ईगल ग्रुपचे अध्यक्ष सुसेन जाधव, सर्वपक्षीय नेते कार्यकर्ते व ग्रामस्थांनी पुसेगावात रास्ता रोको आंदोलनाचा बडगा उगारला होता. गावातील सामाजिक कार्यकर्ते, तरुण मंडळे यांनी वेळोवेळी या रस्त्याचे काम पाहणाऱ्या कंपनी विरोधात असंतोषाचे वातावरण निर्माण केले. मात्र, याचा काहीही परिणाम दिसून येत नव्हता, त्यामुळे काही ग्रामस्थांनी विनामोबदला घेत गावच्या विकासासाठी सिटी सर्व्हेला नोंद असताना देखील आपली स्वमालकीची जागा जेसीबीच्या साह्याने मोकळी करून दिली. यामध्ये देवस्थान ट्रस्टचे माजी अध्यक्ष रणधीर जाधव, शेखर जाधव, सचिन विक्रम जाधव, माजी प्राचार्य टी. एन. जाधव, कुमार जाधव यांनी मनाचा मोठेपणा दाखवून आपली रस्त्यालगतची जागा गावाच्या विकासासाठी सोडून दिली, तसेच मंदिरापासून डॉ. सुरेश जाधव यांच्या हॉस्पिटलपर्यंत रस्त्यालगतच्या अनेक ग्रामस्थ आणि दुकानदारांनी सहकार्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे लवकरच पुसेगावातील वाहतूक समस्या निकालात निघण्याची शक्यता आहे.

## आंबेगावच्या थोरांदळे परिसरात बिबट्यांची दहशत !

**आंबेगाव। प्रत्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील थोरादळे येथील गव्हाळी-उपळीमळा येथे शेतावर एकाच वेळी तीन बिबटे फिरताना दिसल्याने ग्रामस्थांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून या भागात बिबट्यांचा वावर वाढला असून पाळीव जनावरे तसेच शेतकरी वर्ग त्रस्त झाला आहे. रात्रीच नव्हे तर आता दिवसाढवळ्याही बिबटे फिरताना दिसत असल्याने नागरिक घराबाहेर पडायलाही घाबरत आहेत.

वनविभागाला माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी कर्मचारी घटनास्थळी येऊन पाहणी केली. मंगळवारी सकाळी या परिसरात बिबट्या पकडण्यासाठी वनविभागाने पिंजरा लावला आहे. वनविभागाने बिबट्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी पिंजरे आणि पथक तैनात केले असले तरी अजूनपर्यंत त्यांना पकडण्यात यश आलेले नाही.स्थानिक ग्रामस्थांनी वनविभागाला तातडीने बिबट्यांना जेरबंद करण्याची मागणी केली असून मुलाबाळांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली आहे. परिसरातील भीतीचे वातावरण कमी करण्यासाठी वनविभागाने सक्रीय पावले उचलावीत अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## २ लाखाची लाच घेताना तलाठ्याला रंगेहाथ पकडले

**पुणे । प्रतिनिधी**

**जमिनीच्या संगणकीय सातबारा उताऱ्यावर दुरुस्ती करण्यासाठी चार लाखाच्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती दोन लाखाची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने तलाठ्याला केडगाव चौफुला परिसरात रंगेहाथ पकडले.**

दीपक नवनाथ आजबे (वय ३९, रा. आनंद हेरिटेज, केडगाव स्टेशन, मूळ रा. खापर पांघरी, जि. बीड) असे या तलाठ्याचे नाव आहे. तो दौंड तालुक्यातील देलवडी सजा येथील तलाठी आहे. याप्रकरणी, यवत पोलिस ठाण्यात आजबे याच्या विरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार शेतकरी यांनी २०१२ साली देलवडी येथे ०.०६ आर क्षेत्र खरेदी केले असून, तसा महसूल दफ्तरी ७/१२ वर नोंदी झालेल्या आहेत. जुलै २०२४ मध्ये तक्रारदार यांनी जमिनीचा संगणकीय ७/१२ उतारा काढला असता त्यावर तक्रारदार यांच्या नावे ०.०६ आर ऐवजी ०.०३ आर क्षेत्र नोंद दिसून आली. तक्रारदार यांनी संगणकीय ७/१२ वर दुरुस्ती होण्याकरीता ७ ऑगस्ट २०२४ रोजी तलाठी दीपक आजबे यांच्याकडे लेखी अर्ज केला होता. या दुरुस्तीसाठी तक्रारदार यांनी वेळोवेळी तलाठी दीपक आजबे यांची भेट घेतली. तेव्हा त्यांनी काम करून देण्याचे आश्वासन देत होते. सप्टेंबर २०२५ मध्ये तक्रारदार यांच्या संगणकीय ७/१२ उतार्यावर दुरुस्ती करण्याकरिता तलाठ्याने तक्रारदाराकडे हस्तलिखित ७/१२ उतार्याची प्रत मागविली. तेव्हा तक्रारदार यांनी हस्तलिखित प्रत तहसीलदार कार्यालयातून प्राप्त करून तलाठी आजबे याला दिली. त्यावेळी ७/१२ वर दुरुस्ती करण्यासाठी प्रस्ताव तयार करून तो प्रस्ताव तहसीलदार यांच्याकडे पाठविण्यासाठी तलाठ्याने त्यांच्याकडे ४ लाख रुपयांची मागणी केली. याबाबत तक्रारदार यांनी ६ नोव्हेंबर रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. त्यांनतर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा आयोजित केला. केडगाव चौफुला येथील साईराज कॅन्टीनमध्ये तक्रारदाराकडून २ लाख रुपयांची लाच स्वीकारताना दीपक आजबे याला रंगेहाथ पकडण्यात आले. पोलिस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलिस अधीक्षक अजित पाटील, अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक आसावरी शेडगे व अंमलदारांनी हा सापळा आयोजित केला होता. याबाबत पोलिस निरीक्षक शैलजा शिंदे तपास करीत आहेत.

## विवाह समारंभातून २.८८ लाखांचे सोन्याचे दागिने गायब

**पुणे। प्रतिनिधी**

विवाह समारंभात चोरट्याने दोन लाख ८८ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरी केल्याची घटना लोणी काळभोर भागातील एका मंगल कार्यालयात घडली. याबाबत नमीता सुभाष मोरे (वय ५४, रा. सूर्ववंशी टॉवर, भेकराईनगर, हडपसर) यांनी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोरे यांच्या मुलाचा विवाह रविवारी (९ नोव्हेंबर) लोणी काळभोरमधील एका मंगल कार्यालयात पार पडला. कुंजीरवाडी परिसरात हे मंगल कार्यालय आहे. मोरे यांनी स्टेजजवळ पिशवी ठेवली होती. पिशवीत दोन लाख ८८ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने होते. मोरे यांचे लक्ष नसल्याची संधी साधून चोरट्यांनी दागिने ठेवलेली पिशवी चोरून नेली. पिशवी चोरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. याबाबत पोलिस हवालदार माने तपास करत आहेत. सध्या लग्नसराइचे दिवस सुरू आहेत. विवाह समारंभातून ऐवज चोरीला जाण्याच्या घटना यापूर्वीही घडल्या आहेत.

# आरक्षण सोडतीत कही खुशी तो कही गम

## पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक आरक्षण सोडत पूर्ण





**पिंपरी । प्रतिनिधी**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडत प्रक्रिया आज चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे संपन्न झाली. राज्य निवडणूक आयोगाने या आरक्षण सोडतीच्या कामासाठी पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या नियंत्रणाखाली सदर आरक्षण सोडत प्रक्रिया पूर्ण झाली. आज प्रभाग निहाय आरक्षण जाहीर झाल्यानंतर काहींच्या मनासारखे झाले तर काहींना अडचणीचे ठरल्याने या आरक्षण सोडतील काही खुशी तो काही गम अशी स्थिती निर्माण झाली**

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, तृप्ती सांडभोर, यांच्यासह महापालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे,सह आयुक्त मनोज लोणकर, सहायक नगर रचनाकार प्रशांत शिंपी, नगरसचिव मुकेश कोळप, सह शहर अभियंता अनिल भालसाकळे, बापू गायकवाड, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, निवडणूक विभाग उपायुक्त सचिन पवार, अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह निवडणूक कामासाठी नियुक्त करण्यात आलेले महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी सुरूवातीला राज्य निवडणूक आयोगाची आरक्षण सोडतीसाठी असणारी नियमावली सांगितली. त्यानंतर निवडणूक आरक्षण सोडत प्रक्रिया चार टप्प्यात संपन्न झाली. यामध्ये पहिल्या टप्प्यात अनुसूचित जाती प्रवर्ग महिलांकरिता राखीव असणाऱ्या जागांसाठी सोडत शाळकरी विद्यार्थ्यांच्या हस्ते काढण्यात आली. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्यात अनुसूचित जमाती प्रवर्ग महिलांकरिता राखीव असणाऱ्या जागांसाठी सोडत काढण्यात आली. आरक्षण सोडत प्रक्रियेच्या तिसऱ्या टप्प्यात नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग सोडत प्रक्रिया पार पडली. त्यानंतर सर्वसाधारण महिलांच्या जागा निश्चित करण्याकरिता प्रक्रिया पूर्ण करून प्रभागनिहाय आरक्षित जागा जाहीर करण्यात आल्या. आरक्षण कामकाजाचे प्रास्ताविक उपायुक्त सचिन पवार यांनी तर सूत्रसंचालन उपायुक्त अण्णा बोदडे यांनी केले.

### • सोडतीनुसार निघालेले आरक्षण सोडत जोडली आहे •

**प्रभाग क्रमांक: १**
अ) ओबीसी
ब) महिला सर्वसाधारण
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक: २**
अ) ओबीसी महिला
ब) महिला सर्वसाधारण
क) सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : ३**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : ४**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) अनुसुचित जमाती
क) महिला ओबीसी
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : ५**
अ) महिला ओबीसी
ब) ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक : ६**
अ) महिला ओबीसी
ब) ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक: ७**
अ) ओबीसी
ब) महिला सर्वसाधारण
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक : ८**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक: ९**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक: १०**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) अ राखीव
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक : ११**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक: १२**
अ) ओबीसी
ब) महिला सर्वसाधारण
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक: १३**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक: १४**
अ) ओबीसी
ब) महिला सर्वसाधारण
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक: १५**
अ) ओबीसी
ब) महिला सर्वसाधारण
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक: १६**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक: १७**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक: १८**
अ) महिला ओबीसी
ब) महिला सर्वसाधारण
क) सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक: १९**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) अ राखीव
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक: २०**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक: २१**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक : २२**
अ) महिला ओबीसी
ब) महिला सर्वसाधारण
क) अ राखीव
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक : २३**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक : २४**
अ) ओबीसी
ब) महिला सर्वसाधारण
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक : २५**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक : २६**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक : २७**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक : २८**
अ) ओबीसी
ब) महिला सर्वसाधारण
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक : २९**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) महिला अनुसुचित जमाती
क) ओबीसी
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक : ३०**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला अनुसुचित जाती
क) ओबीसी
ड) महिला सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : ३१**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव

**प्रभाग क्रमांक : ३२**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) अ राखीव